रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
• वर्ष १८ • अंक २८२
www.ramprahar.com
• शुक्रवार, १ मे २०२६ • पाने ८ • किंमत ₹२

## आयसीएसई दहावी, बारावीचा निकाल जाहीर



**मुंबई :** सीआयएससीई अर्थात कौन्सिल फॉर दी इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनेशन या शिक्षण मंडळाने घेतलेल्या दहावी (आयसीएसई), बारावीच्या (आयएससी) परीक्षेचा निकाल गुरुवारी (दि.३०) जाहीर करण्यात आला. देशभरात दहावीच्या परीक्षेचा निकाल ९९.१८ टक्के, तर बारावीचा निकाल ९९.१३ टक्के लागला. आयसीएसई व आयएससी या दोन्ही परीक्षांचा निकाल सीआयएससीईच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे. आयसीएसई परीक्षेत ६७ विषयांचा समावेश होता, ज्यात २० भारतीय आणि १४ परदेशी भाषा होत्या, तर आयएससी परीक्षेत ४५ विषय घेण्यात आले, ज्यात १३ भारतीय आणि दोन परदेशी भाषा होत्या. या दोन्ही परीक्षांमध्ये मुलींनी बाजी मारली आहे.

अंतरंग
राज्यात २०४७पर्यंत ३०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट/२
मुंबई-पुणे महामार्गालगतची होर्डिंग्ज जमीनदोस्त/५
राजस्थानचा कर्णधार रियान परागवर दंडात्मक कारवाई/८

# पनवेल एसटी डेपोचे काम लवकरच होणार सुरू

### आमदार प्रशांत ठाकूर यांची माहिती; संयुक्त बैठक आणि पाहणी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील एसटी डेपोचे बांधकाम गेली अनेक वर्षे प्रलंबित होते, परंतु आता या प्रकल्पाला गती देण्यासाठी हालचाली सुरू झाल्या असून लवकरच प्रत्यक्ष काम सुरू होणार असल्याची माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली. त्यामुळे दीर्घकाळ रखडलेल्या या प्रकल्पाला गती मिळणार आहे.

या संदर्भात गुरुवारी (दि.३०) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत एसटीचे महाव्यवस्थापक दिनेश महाजन, संबंधित कॉन्ट्रॅक्टर आणि अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधिकाऱ्यांसमवेत डेपो परिसराची पाहणीही केली. यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, पनवेल एसटी डेपोचा प्रश्न अनेक वर्षांपासून चर्चेत असून काही प्रमाणात तो नागरिकांच्या संतापाचाही विषय बनला आहे. सुरुवातीला रत्नागिरी मॉडेलवर डेपो उभारण्याचा विचार होता. त्यानंतर बीओटी पद्धतीने काम करण्याचा निर्णय घेण्यात आला, मात्र विमानतळ प्राधिकरणाच्या हद्दीत येणारा भाग, पर्यावरणीय परवानग्या तसेच इतर प्रशासकीय अडचणींमुळे प्रकल्पात मोठा विलंब झाला. यामध्ये बऱ्याच अंशी कंत्राटदारही कारणीभूत आहे. आता हा प्रश्न लवकरच मार्गी लावण्यासाठी ठोस निर्णय घेण्यात आले आहेत. विशेषतः पावसाळा जवळ आल्यामुळे प्रवाशांना होणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

डेपोच्या बांधकामासाठी आणि झाडे तोडण्यासाठी आवश्यक परवानग्या तसेच बांधकामासंदर्भातील इतर अडथळे दूर करण्यासाठी संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. **(पान २ वर..)**

## मिसिंग लिंक प्रकल्पाचे आज उद्घाटन

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई आणि पुणे या दोन शहरांमधील प्रवासाचे अंतर आणि वेळ कमी करणाऱ्या बहुप्रतिक्षित यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंकचे काम पूर्ण झाले असून हा मार्ग शुक्रवार, १ मेपासून सार्वजनिक वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन मिसिंग लिंकवरील पूल क्र.१, खोपोली एक्झिट येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.



या समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंह भोसले, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार श्रीरंग बारणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) आणि पोलीस प्रशासनाने या मार्गावरील वाहतूक टप्प्याटप्प्याने सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. सुरक्षेच्या दृष्टीने काही कडक निर्बंधही लागू केले आहेत. हा नवीन मार्ग सुरू झाल्यामुळे घाटातील वाहतूक कोंडीतून प्रवाशांची मोठी सुटका होणार असून प्रवासाचा वेळही लक्षणीयरीत्या वाचणार आहे.

## विधान परिषदेची निवडणूक होणार बिनविरोध

**मुंबई : प्रतिनिधी**



महाराष्ट्र विधान परिषदेच्या नऊ जागांसाठी नियमित निवडणूक, तर एका जागेची पोटनिवडणूक पार पडणार आहे. कुठल्याही पक्षाने अतिरिक्त उमेदवार न दिल्याने ही निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे जवळपास आता निश्चित झाले आहे.

विधान परिषदेसाठी भाजपकडून प्रमोद जठार, सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रज्ञा सातव यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शिंदे शिवसेनेकडून बच्चू कडू आणि नीलम गोऱ्हे, राष्ट्रवादीकडून झिशान सिद्दीकी, तर महाविकास आघाडीकडून 'उबाठा'चे अंबादास दानवे यांना संधी देण्यात आली. उद्धव ठाकरेंनी अंबादास दानवेंना उमेदवारी दिल्यामुळे काँग्रेसकडून नाराजी व्यक्त करण्यात आली होती. काँग्रेसने उमेदवार देण्याबाबतही चर्चा सुरू केली होती, पण ठाकरेंच्या शिष्टमंडळाने काँग्रेस नेत्यांची भेट घेत समजूत काढली. अखेर काँग्रेसकडून विधान परिषद निवडणूक न लढण्याचा निर्णय घेण्यात आला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि ठाकरे सेनेचे अनिल देसाई यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. यावेळी सपकाळ यांनी ठाकरेंनी दिलेल्या उमेदवाराला पाठिंबा असल्याचे जाहीर केले.

सर्व उमेदवारांनी गुरुवारी (दि. ३०) आपले अर्ज भरले. तीन अपक्ष उमेदवारांनीही अर्ज दाखल केला असला तरी त्यांना १० आमदारांची सूचक म्हणून सही नसल्याने या संबंधित अपक्ष उमेदवारांचे अर्ज बाद ठरवले जातील.

## बारावीचा निकाल उद्या

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे बारावीच्या परीक्षेचा निकाल येत्या शनिवारी (२ मे) जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे बारावीच्या परीक्षेच्या निकालाकडे डोळे लावून बसलेल्या पालक, विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

यंदा राज्यातील सुमारे १५ लाख विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली होती. दुपारी १ वाजता विद्यार्थ्यांना ऑनलाईन निकाल पाहता येणार आहे.

## 'एसआयआर'संदर्भात सर्वपक्षीय शिष्टमंडळाची प्रशासनाशी चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भारतीय निवडणूक आयोगाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) अभियानाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात मतदार यादी शुद्धीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. या मोहिमेद्वारे मृत, स्थलांतरित, डुप्लिकेट तसेच बेकायदेशीररीत्या समाविष्ट झालेल्या मतदारांची नावे वगळण्यावर विशेष भर दिला जात आहे. राज्यात एप्रिलपासून या अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे.

या संदर्भात गुरुवारी (दि.३०) प्रांताधिकारी पवन चांडक यांच्या उपस्थितीत पनवेल येथे सर्वपक्षीय बैठक झाली. या बैठकीला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल विधानसभा क्षेत्र बीएलए-१ विधानसभा प्रमुख व नगरसेवक परेश ठाकूर, महापालिकेचे उपायुक्त नानासाहेब कामठे, भाजप शहराध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंजारराव, युवा नेते मयुरेश नेतकर, रूपेश नागवेकर यांच्यासह सर्वपक्षीय उपस्थित होते. उपस्थितांनी प्रशासनाशी चर्चा केली.

या बैठकीत अभियानादरम्यान येणाऱ्या अडचणी, त्यावरील उपाययोजना तसेच अधिकारी आणि राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांच्यात आवश्यक समन्वय कसा साधता येईल यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. अभियानाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यासाठी परस्पर सहकार्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

## बदलत्या युगाप्रमाणे वाटचाल करा -लोकनेते रामशेठ ठाकूर

### महात्मा फुले महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आजच्या बदलत्या युगासोबत स्वतःमध्ये बदल करत आपल्या आयुष्यातील ध्येय पुढे ठेवून चालावे आणि आदर्श नागरिक म्हणून जीवन कसे जगता येईल यासाठी प्रयत्न करावा, असा मौलिक सल्ला रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना दिला.

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात गुरुवारी (दि. ३०) पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू व महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबईचे माजी चेअरमन डॉ. देवानंद शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यावेळी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत शिक्षणाचे महत्त्व विशद केले तसेच पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा ज्योतिबा फुले, महात्मा गांधी अशा थोर महापुरुषांचा आदर्श घेऊन स्वतःच्या भविष्याची वाटचाल करावी, असे आवाहन केले.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले की, रयत शिक्षण संस्थेचा वारसा पुढे घेऊन आपण चालला आहात. आपले आदर्श महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे चरित्र जरूर वाचावे. त्यातून व्यक्तिमत्वाचा विकास होईल.

ते पुढे म्हणाले की, आयुष्यात मोठी स्वप्ने पहा. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात अशक्य काहीच नाही. यश मिळवण्यासाठी संयम पाहिजे. अनेक संधीचे दरवाजे विद्यार्थ्यांसाठी खुले आहेत. केवळ नोकरीच्या मागे न लागता व्यवसायही करावा. जिथे कुठेही तुम्ही संशोधक, शिक्षक, उद्योजक, व्यापारी व्हाल तिथे तुम्ही सर्वोत्कृष्ट व्हा आणि एक जबाबदार नागरिक म्हणून देशाची सेवा करा. **(पान २ वर..)**






# महाराष्ट्रदिनी मोफत डायलिसीस सेवेचा विस्तार; ग्रामीण भागातील रुग्णांना दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून राज्यातील आरोग्य सेवेला बळकटी देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेत, सात जिल्ह्यांमध्ये एमआरआय सेवा सुरू करण्यात येत असून ११ जिल्ह्यांमध्ये डायलिसीस सेवांचा विस्तार करण्यात येत आहे. या सर्व सेवांचे लोकार्पण सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात येणार असून, यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णांना अत्याधुनिक उपचार सुविधा घराजवळ उपलब्ध होणार आहेत.



प्रधानमंत्री राष्ट्रीय डायलिसीस कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील विविध आरोग्य संस्थांमध्ये डायलिसीस सेवा पुरविण्यात येत आहे. याच अनुषंगाने कोल्हापूर, यवतमाळ, बीड, नाशिक, जळगाव, सोलापूर, सातारा, सिंधुदुर्ग, ठाणे, गडचिरोली आणि रत्नागिरी या ११ जिल्ह्यांतील ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये डायलिसीस सेवा सुरू करण्यात येत आहे. या सेवेमुळे किडनी विकारग्रस्त रुग्णांना नियमित व मोफत उपचार मिळणार असून, प्रवासाचा त्रासही कमी होणार आहे.

राज्यातील ९२ आरोग्य संस्थांमध्ये सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर डायलिसीस सेवा यापूर्वीच कार्यान्वित करण्यात आली आहे.

ही सेवा सर्व रुग्णांसाठी पूर्णपणे निःशुल्क असून, गुणवत्तापूर्ण उपचार ग्रामीण भागातच उपलब्ध करून देण्याचा सरकारचा उद्देश आहे. यासोबतच भंडारा, बुलढाणा, अमरावती, नांदेड, धाराशिव, हिंगोली आणि परभणी या सात जिल्ह्यांतील शासकीय रुग्णालयांमध्ये एमआरआय सेवा सुरू करण्यात येत आहे. या सेवा २४x७ उपलब्ध राहणार असून सर्व शासकीय रुग्णांसाठी पूर्णपणे मोफत असतील. या प्रकल्पासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ, जसे की टेक्निशियन व रेडिओलॉजिस्ट, हे सेवापुरवठादारा मार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

एमआरआय ही आधुनिक वैद्यकीय तपासणी पद्धत असून, शरीरातील अंतर्गत अवयवांचे सविस्तर व उच्च गुणवत्तेचे चित्र मिळवण्यासाठी ती उपयुक्त ठरते. यामुळे अचूक निदान, रोगाचे स्वरूप समजणे, उपचाराचे योग्य नियोजन करणे आणि उपचारांना मिळणारा प्रतिसाद तपासणे शक्य होते.

**लोकार्पण करण्यात येणारी डायलिसीस केंद्र**

कोल्हापूर (मुरगुड), यवतमाळ (दारव्हा), बीड (केज), नाशिक (इगतपुरी), जळगाव (रावेर), सोलापूर (मंगळवेढा), सातारा (ढेबेवाडी), सिंधुदुर्ग (वेंगुर्ला), ठाणे (बदलापूर), गडचिरोली (कुरखेडा), रत्नागिरी (दापोली).

**लोकार्पण करण्यात येणारी एमआरआय केंद्र**

भंडारा, बुलढाणा, अमरावती (संदर्भ सेवा रुग्णालय), नांदेड, धाराशिव, हिंगोली, परभणी. या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम होणार असून, विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.

# अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत डंपरची डोकेदुखी; धुरळ्यामुळे अपघातांचे सत्र

**पाली : प्रतिनिधी**

प्रसिद्ध अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात अवजड आणि ओव्हरलोड डंपरने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. कधी रस्त्यावर सांडणारी खडी आणि उडणारा धुरळा, तर कधी बेभान वेगामुळे होणारे अपघात यामुळे स्थानिक नागरिक, भाविक आणि व्यापारी मेटाकुटीला आले आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पालीकरांच्या जीविताला मोठा धोका निर्माण झाला असून संतापाची लाट उसळली आहे.




रविवारी (ता. २६) मुख्य रस्त्यावरून जाणाऱ्या एका डंपरमधून मोठ्या प्रमाणावर बारीक खडीचा भुगा (ग्रीट) सांडत होता. यामुळे संपूर्ण परिसरात धुळीचे लोट उसळले होते, ज्यामुळे पादचारी आणि दुचाकीस्वारांना 'धुळीने आंघोळ' करण्याची वेळ आली. समाज माध्यमांवर हा व्हिडिओ देखील मोठ्या प्रमाणावर फिरत होता. रस्त्यावर सांडलेल्या खडीमुळे दुचाकी घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले असून, शाळकरी विद्यार्थ्यांना चालणेही कठीण झाले आहे.

केवळ धूळच नव्हे, तर डंपरच्या बेजबाबदार वाहतुकीमुळे अपघातांचे सत्र सुरूच आहे. सोमवारी रात्री एका बेभान डंपरने आगरआळी जवळ उभ्या असलेल्या दोन दुचाकींना जोरदार धडक दिली. सुदैवाने त्या ठिकाणी कोणीही नसल्याने मोठी जीवितहानी टळली. यापूर्वी जानेवारीत ग्रामविकास अधिकारी सचिन केंद्रे आणि फेब्रुवारीत महावितरणचे कर्मचारी अनंत सोनवणे हे देखील झालेल्या अपघातात गंभीर जखमी झाले होते.

**ओव्हरलोड डंपर वाहतुकीमुळे शाळकरी विद्यार्थी, पालक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या जीविताला मोठा धोका निर्माण झाला आहे. अवजड वाहतूक थांबावी यासाठी नगरपंचायतीला निवेदन दिले होते, मात्र कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. प्रशासनाने ही ओव्हरलोड वाहतूक तातडीने बंद करावी; अन्यथा सामान्य पालीकर रस्त्यावर उतरतील.**

**-श्रीकांत ठोंबरे, अध्यक्ष, सुधागड तालुका भाजप**

# 'युनाइटेड वे'कडून देवपाडा शाळेत येणाऱ्या ७१ मुलींना सायकल वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक आणि शेती क्षेत्रात कार्य करणाऱ्या मुंबई येथील युनायटेड वे या संस्थेकडून देवपाडा शाळेतील विद्यार्थिनी यांना सायकली वाटप करण्यात आल्या. देवपाडा येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या चिंचवाडी, वाघाचीवाडी, उंबरवाडी आणि देवपाडा गावातील विद्यार्थिनींना या सायकली वाटप करण्यात आल्या. एकूण ७१विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्याच्या कार्यक्रमानंतर आदिवासी विद्यार्थिनी यांच्या चेहऱ्यावर हसू उमटले आणि युनायटेड वे चे पदाधिकारी देखील समाधानी झाल्याचे दिसून आले.



युनायटेड वे मुंबई या संस्थेकडून कर्जत तालुक्यात जिल्हा परिषदेच्या तसेच खासगी शाळांना मदत करीत असतात. असंख्य विद्यार्थांना आणि शाळांना मदत करणाऱ्या या संस्थेकडून कर्जत तालुक्यात जलसमृद्धी अभियान देखील राबविले जात आहे.त्यातून जमिनी मध्ये पाण्याची पातळी वाढवण्याचे कार्य आणि रोपवाटिका निर्मिती मधून महिला बचत गटांना आर्थिक स्थिरता देण्याचे कार्य ही संस्था करीत आहे. तालुक्यातील देवपाडा या मोठ्या लोकवस्तीच्या गावात आठवी पर्यंत जिल्हा परिषद शाळा असून या शाळेत परिसरातील चार आदिवासी वाड्यांमधील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असतात. ही बाब लक्षात घेऊन या शाळेचे शिक्षक देसाई यांच्या माध्यमातून युनायटेड वे या संस्थेचे विद्यार्थिनींची पायपीट कमी करण्यासाठी सायकल भेट देण्याचे निश्चित केले. त्यानुसार शाळेत शिकणाऱ्या तब्बल ७१ विद्यार्थिनींना सायकली भेट देण्याचा कार्यक्रम शाळेच्या आवारात पार पडला. यावेळी कर्जत तालुका पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे, युनायटेड वे या संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# राज्यात २०४७पर्यंत ३०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट हरित महाराष्ट्र आयोगाची भूमिका ठरणार महत्त्वाची

**नवी मुंबई : बातमीदार**

विकसित महाराष्ट्र२०४७ अंतर्गत राज्याचे हरित आच्छादन ३३ टयांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ३०० कोटी वृक्ष लागवड अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी व वृक्षारोपण मोहिमेच्या योग्य रितीने अंमलबजावणीसाठी हरित महाराष्ट्र आयोग महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी मुंबई येथे सांगितले.

मंत्रिमंडळ बैठकीत ३०० कोटी वृक्ष लागवड अभियानाच्या अंमलबजावणीसाठी "हरित महाराष्ट्र आयोग" अशी एक विशेष उद्देशीय स्वतंत्र संस्थात्मक यंत्रणा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. याअनुषंगाने नाईक यांनी माहिति दिली. राष्ट्रीय वन धोरण, १९८८ नुसार देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी किमान ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित व वृक्षाच्छादितं असणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्याचे सध्याचे वनाच्छादन व वृक्षाच्छादन सुमारे २१.२५ टक्के असून राज्याचे एकूण क्षेत्र 33 टयापर्यंत वाढवण्याकरिता हरित आच्छादनात एकूण ११.७५ टक्के वाढ करावी लागणार आहे.

याप्रमाणे वृद्धी केल्यास राज्यामध्ये हवामान बदलाने होणाऱ्या विपरीत परिणामास आळा घालणे शक्य होईल, हरित आच्छादनामुळे जमिनीची धूप कमी होईल, पाणी वाहून जाण्यास प्रतिबंध होऊन पाणी जमिनीत मुरून, जलस्तरात वाढ होण्यास मदत होईल. ग्रामीण तसेच शहरी भागात रोजगार संधी निर्माण होतील. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी हरित महाराष्ट्र आयोग कार्य करणार आहे. या अभियानाच्या मोहिमेचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व वित्त पुरवठ्यासाठी विशेहेष उद्देशीय स्वतंत्र संस्थांत्मक यंत्रणा म्हणून हा आयोग काम पाहणार आहे.

अभियानाच्या प्रभावी धोरण दिशा निर्देश व कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी या आयोगाअंतर्गत नियामक समिती व कार्यकारी परिषद गठित करण्यात येणार आहे. तसेच वन विभाग, महाराष्ट्र परिवर्तन संस्थेच्या (मित्रा) सहाय्याने सदर मोहिमेकरीता समन्वयक विभाग म्हणून कार्य करेल. या अभियानाअतंर्गत संबंधित विभागांसाठी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट आयोगामार्फत निश्चित करण्यात येणार आहे.

प्रशासकीय अडचणी टाळून हरित महाराष्ट्र घडविण्यासाठी हा आयोग कार्यरत असणार आहे. आयोगाअंतर्गत ३०० कोटी वृक्ष लागवड मोहिमेची अंमलबजावणी व नियमित आढावा घेणे, लोकसहभाग व संस्थात्मक मॉडेल्स आधारित वृक्षारोपणाला प्रोत्साहन देणे, तंत्रज्ञानावर आधारित संनियंत्रणासाठी जिओ टॅगिंग करणे, उपग्रह व जीआयएस आधारित मॉनिटिरिंग व डिजिटल डॅशबोर्ड तयार करणे, पाचव्या वर्षापर्यंत किमान ६० टक्के जिवंत रोपे असतील याची निश्चिती करणे, कार्बन क्रेडिट व ट्री क्रेडिटशी संबंधित कामकाज, सार्वजनिक खासगी धोरणांतर्गत व कार्बन क्रेडीट चे माध्यमातून निधी उपलब्ध करणे, लँड बँक तयार करणे, मियावाकी मॉडेलद्वारे शहरी हरित क्षेत्र वाढविणे, बीज संकलन केंद्र व दर्जेदार रोपनिर्मिती व रोपवाटिकांची क्षमता वाढविणे आदी या आयोगाची प्रमुख कार्ये व घटक आहेत.

३०० कोटी वृक्ष लागवड करण्यासाठी सुमारे २७ लाख हेक्टर क्षेत्राची आवश्यकता राहणार आहे. राज्यातील शासकीय पोटखराब जमिन उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. तसेच विविध स्त्रोतांमधून एकत्रित करून लागवड योग्य क्षेत्रांची लँडबँक तयार करण्यात येणार आहे.आयोगाअंतर्गत नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री असतील तर उपमुख्यमंत्री हे उपाध्यक्ष असणार आहेत. तर वन मंत्री तसेच पर्यावरण, कृषी, रोजगार हमी विभागाचे मंत्री हे सह अध्यक्ष असणार आहेत. तर मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे या मंडळाचे सदस्य सचिव असतील. कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार तथा मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे आहेत तर मुख्य सचिव हे सहअध्यक्ष असणार आहेत.

# जुन्या कशेडी घाटात बस व काँक्रीट मिक्सरची टक्कर; १० जण किरकोळ जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर अपघात सातत्याने होत आहेत. कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्ग सुरू झाल्याने वाहतुक सुरळीत झाली असूनही जुन्या कशेडी घाटात खचलेल्या 'डेंजरझोन'मध्ये बुधवार,दि.२९ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास महामार्गावरील भोगावजवळ खेड बोरीवली एसटी बस आणि



काँक्रीट मिक्सर वाहनाची टक्कर होऊन झालेल्या बसमधील ९प्रवासी व काँक्रीट मिक्सर वाहनाचा चालक असे १० जण किरकोळ जखमी झाले. जखमींना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

पोलादपूर पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार खेड एसटी स्थानकातून खेड ते बोरिवली रातराणी बस घेऊन चालक बाळकृष्ण सुखदेव मिंड (रा.खेड) हे जुन्या मार्गावर कशेडी आंबा तसेच कशेडी बंगला थांबून प्रवासी घेत कशेडी घाटामधून मार्गस्थ होताना पोलादपूर हद्दीतील भोगावजवळ आली असता महामार्ग खचलेल्या 'डेंजरझोन'मध्ये बसचे ब्रेकफेल झाल्याने बस विरुध्द दिशेला गेली आणि समोरील आयशर कंपनीच्या उभ्या असलेल्या काँक्रीट मिक्सरला समोरासमोर टक्कर दिली. या भीषण अपघात बसमधील नऊ प्रवासी व स्वतः काँक्रीट मिक्सर चालक असे १० जण जखमी झाले. या बसमध्ये वाहक चालकासह नऊ प्रवासी होते. अपघातग्रस्त बस ब्रेकफेल झाल्यानंतर दरीच्या बाजूने कलंडली असती तर जीवघेणा अपघात झाला होण्याची शक्यता होती.

# नवी मुंबईतील ग्राहकांना अखंड व सुरळीत वीजपुरवठा करावा; अन्यथा आंदोलन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एमएसईडीसीएल मार्फत शहरातील घरगुती आणि व्यावसायिक ग्राहकांना विद्युत पुरवठा सुरळीत आणि अखंडित करावा अन्यथा वीज वितरण कंपनीच्या विरोधात आंदोलन करू असा इशारा उपमहापौर दशरथ भगत यांनी दिला आहे. वीज वितरण कंपनीचे वरिष्ठ अधिकारी आपली जबाबदारी पार पाडत नाहीत .परिणामी ,वीज सेवेचा शहरात बोजवारा उडाला असल्याचा आरोप उपमहापौर दशरथ भगत यांनी केला आहे. वीज ग्राहक पूर्णतः देयक अदा करीत असताना वीज ग्राहकांना विविध प्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी वाशीगाव येथेएमएसईडीसीएलचे वाशी मंडळ अधिक्षक अभियंता दिपक पाटील यांच्यासह वरिष्ठ विद्युत अभियंते यांच्या सोबत उपमहापौर दशरथ भगत यांनी बैठकीचे आयोजन केले होते . यावेळी नगरसेवक निशांत भगत,नगरसेविका प्रिती भगत, संदीप भगत यासह वीज ग्राहक उपस्थित होते.



या बैठकीत वीज संदर्भात विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. यात वाशीगाव, गावियो परिसर, सानपाडा - पामबीच परिसर व वाशी सेक्टर ३० आणि सेक्टर १७ येथील वारंवार खंडीत होत असलेला वीजपुरवठा , नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ग्राहकांना होत असलेला खंडीत वीज पुरवठा, संपूर्ण नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील नोड्स मध्ये वीज वितरणच्या नियोजनशून्य कारभारामुळे भूमिगत विद्युत वाहिन्यांची दुर्दशा , मलमपत्ती (जॉईन्टस ) यासाठी रस्ते, पदपथ विनापरवानगी खोदकाम आणि यामुळे होणारे मनपाचे आर्थिक नुकसान आदी बाबी दशरथ भगत यांनी यावेळी निदर्शनास आणल्या. ऐन उन्हाळ्यात २४ -२४ तसेच १२-१२ तास वीज पुरवठा खंडित झाल्याने नवी मुंबईतील निवासी ग्राहकांमधील जेष्ठ नागरिक, आजारी व उपचार घेत असलेले रुग्ण, लहान मुलं यांना नियमित वीज बिलं भरणा करून देखील आकारण त्रास सहन करावा लागत आहे तसेच वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे शहरातील व्यापार, उद्योग व व्यावसायिक यांचे होणारे नुकसान हे प्रचंड आहे. यातील काही घटक हे मेडिकल व पॅरामेडिकल सेवा व पुरवठ्याशी संबंधित असल्याचे भगत यांनी निदर्शनास आणले.

एमएसईडीसीएल कंपनीचे नियोजन नाही त्यांच्यात समन्वयचा अभाव आहे . यामुळे महापालिकेच्या मालमत्तांची वारंवार दुरुस्ती आणि खोदकाम यामुळे मनपा प्रशासनाची आर्थिक नासाडी होत असल्याची बाब दशरथ भगत यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या दर्शनास आणली. एमएसईडीसीएल कंपनीचे काही अधिकारी बेकायदा आर्थिक व्यवहार करीत असून अशांवर दंडात्मक कार्यवाही शासनाने करावी अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलन करावे लागेल असा इशारा त्यांनी दिला आहे.

## पान १ वरुन

### पनवेल एसटी डेपोचे काम लवकरच होणार सुरू

या प्रकल्पात एकूण जागेच्या ५५ टक्के भागावर एसटी डेपो आणि वर्कशॉप उभारण्यात येणार आहे, तर उर्वरित ४५ टक्के जागा डेव्हलपरला देण्यात येणार असून डेव्हलपरला दिलेल्या जागेतूनच डेपोचा खर्च उचलला जाणार आहे. संबंधित सर्व परवानगी मिळाल्यानंतर २४ महिन्यांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि साहित्य उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. आम्ही सर्वजण एसटी डेपोची इमारत लवकरात लवकर पूर्ण व्हावी यासाठी पाठपुरावा करत आहोत, असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले

या बैठकीला पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, नगरसेवक गणेश कडू, भाजप शहराध्यक्ष नगरसेवक सुमित झुंजारराव, अनुसूचित जाती सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष सदस्य अमित जाधव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, नगरसेविका रूचिता लोंढे यांच्यासह जिल्हा परिषदेचे सदस्य, पंचायत समितीचे सदस्य, नगरसेवक, इतर पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

### बदलत्या युगाप्रमाणे वाटचाल करा -लोकनेते रामशेठ ठाकूर

प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी उपस्थितांचे स्वागत व मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील पदवीधर व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. रमेश म्हात्रे, डॉ. लक्ष्मण गवळी, प्रा. जनार्दन वारघडे यांच्यासह विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.पी.एस. गायकर व डॉ. प्रफुल्ल वशेणीकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उपप्राचार्य डॉ.आर.पी. म्हात्रे यांनी मानले.

# रोह्यातील रिक्षावाल्यांच्या प्रश्नावर तोडगा काढण्याचे आश्वासन

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरात रिक्षा स्टँड संदर्भित काही प्रश्न ऐरणीवर आल्यानंतर रोहा शहरातील रिक्षा संघटनेचे पदाधिकारी व रिक्षा चालक-मालक यांनी गुरुवारी सकाळी मुख्याधिकारी सह नगरसेवकांची भेट घेतली. यावेळी येत्या तीन-चार दिवसात बैठक घेऊन या संदर्भात योग्य व समाधानकारक तोडगा काढण्याचा आश्वासन नगरसेवक यांनी यावेळी दिले.

यावेळी मुख्याधिकारी अजयकुमारएडके, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, गटनेते अहमद दर्जी, सभापती महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, निता हजारे, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, नगरसेवक अजित मोरे, रिक्षा संघटनेचे अध्यक्ष लीलाधर मोरे, अध्यक्ष रमेश साळवी, रुपेश मळेकर आदी उपस्थित होते.

रोहा शहरात रोहा अष्टमी नगर परिषदच्यावतीने रस्ता रुंदीकरणाचा काम चालू आहे. ठीक ठिकाणी अतिक्रमण काढण्यात येत आहेत. याच अनुषंगाने काही ठिकाणी रिक्षा स्टॅन्डचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. हा रोटी रोजी चा प्रश्न असल्याने यावर समाधानकारक तोडगा काढावा यासाठी रोहा शहरातील रिक्षा संघटनाचे पदाधिकारी व रिक्षा चालक-मालक यांनी नगरपरिषदेस भेट दिली. यावेळी त्यांनी मुख्याधिकारी अजयकुमार एडके व उपनगराध्यक्ष, सभापती नगरसेवक यांच्याशी चर्चा केली. आपल्या विविध समस्या यावेळी त्यांच्यासमोर मांडल्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# उलवेतील रामशेठ ठाकूर मैदानावर लाठीकाठी फिरवण्याचा विश्वविक्रम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवकालीन पारंपरिक खेळांच्या जतनासाठी कार्यरत असलेल्या वॉरियर्स क्लबच्या विद्यार्थ्यांनी गुरुवारी (दि.३०) दुहेरी लाठीकाठी फिरवण्याचा विश्वविक्रम प्रस्थापित केला. उलवे येथील रामशेठ ठाकूर मैदानावर सकाळी ८ ते ९ या दरम्यान सलग एक तास विद्यार्थ्यांनी दोन्ही हातांनी लाठीकाठी फिरवत हा विक्रम केला असून, याची नोंद Golden Book of World Records मध्ये करण्यात आली आहे.

नवी मुंबईतील वॉरियर्स क्लबच्या माध्यमातून शिवकालीन खेळांचे प्रशिक्षण देणारे सचिव व प्रशिक्षक ओमकार रंधवे आणि सहप्रशिक्षिका ऋतुजा रंधवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वी झाला. या विश्वविक्रमामुळे नवी मुंबईची शान उंचावली असून, पारंपरिक खेळांविषयी तरुणांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे.

यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे आणि प्रशिक्षकांचे कौतुक करताना, मराठी मातीतल्या शिवकालीन खेळांचे संवर्धन करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला Golden Book of World Recordsचे एशियन हेड व मॅनेजर डॉ. मनीष विश्नोई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय लाठी महासंघाचे उपाध्यक्ष सुरेंद्र शिंदे, कविता शिंदे, लहू चव्हाण, पोलीस निरीक्षक सज्जन लांडगे, मुंबईतील पोलीस अधिकारी सौ. साकुंडे, गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय घरत, प्रा. संतोष रंधवे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या यशामुळे उलवे आणि नवी मुंबई परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, पारंपरिक खेळांच्या संवर्धनाला नवे बळ मिळाले आहे.

# जनगणना प्रकियेत नागरिकांनी सहकार्य करण्याचे उरण तहसीलदारांचे आवाहन

**उरण : बातमीदार**

भारत सरकारच्या महत्त्वाकांक्षी जनगणना २०२७ कार्यक्रमास सुरुवात झालेली असून या अंतर्गत पहिल्या टप्प्यातील विविध प्राथमिक कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. सदर जनगणना ही देशाच्या विकास आराखड्यासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, अचूक व अद्ययावत माहिती संकलित करण्यासाठी नागरिकांचे सक्रिय सहकार्य आवश्यक आहे.

या कार्यक्रमांतर्गत प्रगणक व पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात येत असून, क्षेत्रनिहाय घरगुती माहिती संकलन, गाव/शहर नकाशे तयार करणे (Mapping) आदी कामांना गती देण्यात येत आहे. यावेळी नागरिकांना कळविण्यात येते की, १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वगणना (Self Enumeration) सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिकांनी स्वतःच्या मोबाईलद्वारे अधिकृत वेबसाईटवर जाऊन आपली माहिती अचूकपणे भरावी, असे आवाहन उरण तालुक्याचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी जनतेला केले आहे.

जनगणना संदर्भातील अधिक माहिती व स्वगणना करण्यासाठी नागरिकांनी खालील अधिकृत वेबसाईटचा उपयोग करावाः

https://censusindia.gov.in स्व-गणना प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

१) अधिकृत पोर्टलवर प्रवेश करून लॉगिन करा. २) कुटुंब प्रमुखाचे नाव व मोबाईल क्रमांकाच्या आधारे कुटुंब नोंदणी करा. ३) पसंतीची भाषा निवडून मोबाईलवर प्राप्त झालेला OTP प्रविष्ट करा. ४) राज्य, जिल्हा व स्थानिक पातळीवरील आवश्यक तपशील निवडा. ५) डिजिटल नकाशावर आपल्या निवासस्थानाचे अचूक स्थान निश्चित करून मार्क करा. ६) दिलेली प्रश्नावली काळजीपूर्वक पूर्ण करा.

७) भरलेली माहिती पूर्वावलोकन करून आवश्यक त्या दुरुस्त्या करा. ८) अंतिम सादरीकरण (Submit) करा. ९)प्रगणक भेटीस आल्यास त्यांना आपला SE ID अवश्य कळवा. १०) SE ID मधील माहिती व प्रगणकाने संकलित केलेली माहिती जुळल्यास ती माहिती ग्राह्य धरण्यात येईल.

*जनगणना ही केवळ शासकीय प्रक्रिया नसून देशाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी प्रगणकांना आवश्यक ती माहिती प्रामाणिकपणे व वेळेत द्यावी, तसेच या कार्यात प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे.*

**-डॉ. उध्दव कदम,**
*तहसीलदार उरण*

# जनगणनेसाठी पनवेल महापालिका प्रशासन सज्ज

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय उपक्रम असलेल्या जनगणना २०२७च्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका प्रशासन पूर्णतः सज्ज झाले आहे. शहरातील सर्व नागरिकांची अचूक व वेळेत माहिती संकलन होण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना प्रक्रियेची तयारी युद्धपातळीवर सुरू आहे.

जनगणना २०२७ अंतर्गत पहिल्या टप्प्यातील तयारीचा एक भाग म्हणून महानगरपालिकेच्या वतीने २०४७ पर्यवेक्षक व प्रगणक नियुक्ती करण्यात आली आहे. पर्यवेक्षक व प्रगणकांसाठी पनवेल महानगरपालिकेकडून तीन दिवसीय सविस्तर प्रशिक्षण कार्यक्रम २३ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत यशस्वीरीत्या घेण्यात आले आहे. पर्यवेक्षकांचे जनगणना प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये यासाठी गेल्या काही दिवसांपासून विविध स्तरांवर मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच डिजिटल माध्यमांचा वापर करून माहिती संकलन अधिक सुलभ व अचूक करण्यावर भर दिला जात आहे.

जनगणना २०२७ची सुरुवात आता स्व-गणनेने (Self Enumeration) होणार आहे. ही स्व गणना १ ते १५ मे दरम्यान होणार आहे. यासाठी भारत सरकारने सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपल्या कुटुंबाची माहिती नागरिकांनी अचूक आणि वेळेत भरावी. ही प्रक्रिया अतिशय सोपी, सुरक्षित आणि पूर्णतः ऑनलाईन आहे.

यासाठी नागरिकांनीही सहकार्य करण्याचे आवाहन पनवेल महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे. स्व-गणना (Self Enumeration) सुविधेचा जास्तीत जास्त वापर करून नागरिकांनी आपली माहिती स्वतः नोंदवावी, असेही सांगण्यात आले आहे. स्व-गणना केल्यामुळे वेळेची तर बचत होणारच आहे तसेच अचूक माहितीही नोंदवता येणार आहे. यामुळे प्रशासनाचे काम सुलभ होणार आहे.

**देशाच्या विकासाचा पाया अचूक माहितीवर आधारित असतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने ही आपली जबाबदारी समजून स्व-गणनेत सहभागी व्हावे आणि विकसित भारताच्या उभारणीत आपले योगदान द्यावे.**

**-मंगेश चितळे, आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

पनवेल महानगरपालिका प्रशासन जनगणना २०२७ यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सज्ज असून नागरिकांच्या सक्रिय सहभागातून ही मोहीम अधिक प्रभावी होणार आहे.

# पनवेलमध्ये अतिक्रमणाविरोधात कारवाई





## अनधिकृत चिकन, मटण दुकानांवर हातोडा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल प्रभाग समिती ड मार्फत मोठी अतिक्रमण विरोधी कारवाई करण्यात आली. मंगळवारी झालेल्या या कारवाईत नवीन पनवेलमधील गणेश मार्केटच्या बाजुची चिकनची दुकाने, सेक्टर ३ मनसे रोड येथील चिकन दुकाने, सेक्टर १३ अंबराई गार्डन बाजुला चिकन मटनच्या दुकानांवर तोडक कारवाई करण्यात आली.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार करण्यात आलेल्या या कारवाईत विविध ठिकाणांवरील अनधिकृत चिकन व मटन स्टॉलवर कारवाई करून साहित्य जप्त करण्यात आले. महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागांमध्ये अतिक्रमण विरोधात कारवाई करण्याच्या सूचना उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिल्या आहेत. त्यानूसार चारही प्रभागात अतिक्रमण विरोधी मोठ्या कारवाया सुरू आहेत. या अंतर्गत नवीन पनवेल मधील अनधिकृत चिकन व मटण दुकानांवर कारवाई करण्यात आली.

चिकन व मटण दुकानांच्या वाढलेल्या संख्येमुळे उडणाऱ्या पक्षांची संख्या वाढत आहे व त्याचा परिणाम नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्टच्या विमानांना होत असल्यामुळे सदरच्या दुकानंवर कारवाई करण्यात आली. ही कारवाई सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी रूपाली माने व प्रभारी प्रभाग अधीक्षक राजेश डोंगरे तसेच अतिक्रमण कर्मचारी व रायगड सुरक्षा रक्षक यांच्यामार्फत करण्यात आली.

अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवरती महापालिकेने तोडक कारवाईचा बडगा उचलला असून यापुढेही अनधिकृत व्यवसायधारकांवर अशाच प्रकारची कारवाई पुढेही सुरू राहील, असे महापालिकेतर्फे सूचित करण्यात आले आहे.




**पनवेल : सांस्कृतिक कलादर्पण पुरस्कार सोहळ्यात नाट्य निर्मात्या कल्पना विलास कोठारी यांच्या 'गोष्ट तिच्या घटस्फोटाची' नाटकाला सर्वोत्कृष्ट नाटकसह तब्बल सहा पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यामध्ये सर्वोत्कृष्ट लेखक डॉ.नरेश नाईक, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक राजन ताम्हाणे, सर्वोत्कृष्ट नेपथ्य संदेश बेंद्रे, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री आदिती देशपांडे, सर्वोत्कृष्ट अभिनेता संग्राम समेळ आणि सर्वोत्कृष्ट नाटक असे पुरस्कार मिळाले. हे पुरस्कार निर्मात्या कल्पना कोठारी, निल कोठारी, डॉ.नरेश नाईक, राजन ताम्हाणे, संदेश बेंद्रे, अदिती देशपांडे, संग्राम समेळ यांनी स्वीकारले.**

# खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवार, २९ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता वर्कशॉप व सेमिनार कमिटी आणि अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांच्या मार्फत नवकल्पनांना चालना देण्यासाठी एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते.

आंतरराष्ट्रीय परिषद दोन सत्रात पार पडली. पहिल्या सत्रात अध्यक्ष स्थानी जे बी एस पी संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे सर होते. प्रमुख वक्ते म्हणून खलिफा युनिव्हर्सिटी, अबू धाबी येथील डॉ.निलेश चोडणकर होते. प्रभारी प्राचार्या डॉ महेश्वरी झिरपे मॅडम यांनी उपस्थित सर्वांना परिषदेविषयी माहिती सांगून मान्यवरांचे शब्द सुमनानी आभार व्यक्त केले. संस्थेचे सचिव डॉ.एस.टी.गडदे सर यांनी ही ऑनलाईन उपस्थित राहून परिषदे विषयी आपले अनमोल विचार मांडले आणि शुभेच्छा दिल्या.

आंतरराष्ट्रीय परिषदेचा मुख्य विषय इनोवेशन फॉर सस्टनेबल डेव्हलपमेंट :इंटिग्रेटिंग सायन्स टेक्नॉलॉजी अँड कॉमर्स हा असून ही परिषद ऑनलाईन स्वरूपात घेण्यात आली. परिषदेसाठी जगभरातील संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्रातील व्यक्ती अशा एकूण ८१ जणांनी ऑनलाईन सहभाग नोंदवला होता. या परिषदेत वाणिज्य व व्यवस्थापन तसेच विज्ञान व तंत्रज्ञान या दोन प्रमुख विभागांअंतर्गत एकूण १२ लोकांनी आपले संशोधन पेपर सादर केले. वाणिज्य विभागात कॉर्पोरेट गव्हर्नन्स, उद्योजकता, बिझनेस मॅनेजमेंट, ऑडिटिंग, स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट, ई-बिझनेस सेवा, अकाउंटिंग थिअरी अँड प्रॅक्टिसेस आणि गुंतवणूक यांसारख्या विषयांवर संशोधन निबंध सादर करण्याची संधी दिली तर विज्ञान व तंत्रज्ञान विभागात नवीकरणीय ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ऊर्जा साठवण उपकरणे, स्मार्ट मटेरियल्स, कॉम्प्युटेशनल मॉडेलिंग, क्वांटम कम्प्युटिंग, जीनोमिक्स, ब्लॉकचेन, सायबर सिक्युरिटी, पर्यावरण अभ्यास, नॅनोतंत्रज्ञान, अनालिटिकल मेथड डेव्हलपमेंट आणि ग्रीन व सस्टेनेबल केमिस्ट्री या अत्याधुनिक विषयावर संशोधन पेपर सादर करण्यात आले.

या परिषदेचा उद्देश विविध शाखांमधील ज्ञानाचा समन्वय साधून नवकल्पना आणि विकासाला चालना देणे हा होता. बदलत्या जागतिक परिप्रेक्ष्यात उद्योग, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रांमध्ये बहुविषयक दृष्टिकोनाची गरज अधोरेखित करण्यासाठी ही परिषद महत्त्वाची ठरली. दुसऱ्या सत्रात टेक्निकल सेशन आणि संशोधन निबंधाचे सादरीकरण करण्यात आले. डॉ गिरीश गुंड आणि डॉ. अनया मर्कंडेय यांनी सदर शोध निबंध वाचकाचे योग्य मूल्यमापन करून योग्य सूचना केल्या. या परिषदेसाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे मॅडम तसेच समन्वयक म्हणून प्रा. प्रथमेश उदेकर यांनी उत्तम काम केले. सूत्रसंचालन नीलम मोरे मॅडम यांनी केले. टेक्निकल टीमने ही उत्तम कामगिरी केली.

पहिल्या सत्रात प्रा.राहुल कांबळे सर यांनी प्रमुख वक्ते डॉ.निलेश चोडणकर यांचा परिचय करून दिला तर प्रा.तनुजा सुमन यांनी पहिल्या सत्रात सर्वांचे आभार व्यक्त केले दुसऱ्या सत्रातील आभार प्रा. प्रथमेश उदेकर यांनी व्यक्त केले. डॉ.निलेश कोरगावकर (सायन्स) आणि नमित भटनागर (कॉमर्स)यांनी उत्कृष्ट पेपर सादर केले त्याबद्दल दोघांचे अभिनंदन केले. शेवटी ऑनलाईन फीडबॅक घेऊन परिषद यशस्वी पार पाडली.

# एचआयएल कंपनीच्या एक्स एम्प्लॉई पेन्शनर्स असोसिएशनचे स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात एचआयएल रसायनी Ex-Employee Pensioners Associationयांच्या वतीने आयोजित स्नेहसंमेलन व कोअर कमिटीचा सत्कार समारंभ बुधवारी (दि.२९) उत्साहात झाला. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे शहराध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंजारराव आदी उपस्थित होते.





या वेळी कोअर कमिटीतील सदस्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून हिल इंडिया लिमिटेड रसायनीचे युनियन हेड धनदास सोनवाणी, अध्यक्ष भाऊराव टेंभुर्णे, सचिव नरेंद्र लाखन, खजिनदार मोहन म्हात्रे, कमिटी सदस्य अॅड. दत्तात्रय शिंदे, विलास घरत, शामराज राव यांचा सत्काराच्या कार्यक्रमच आयोजन करण्यात आला होत. मोठ्या संख्येने हायर पेन्शनर कर्मचारी व सभासद सहभागी झाले होते. आपल्या मनोगतात आमदार प्रशांत ठाकूर यांनी समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले. समाजात स्वतःसाठी जगणारी अनेक माणसे असतात, मात्र समाजासाठी आणि सहकाऱ्यांसाठी जगणारे लोक वेगळे असतात. अशा व्यक्तींचा सन्मान होत राहणे आवश्यक आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

दरम्यान, भाजपचे| पनवेल शहरध्यक्ष नगरसेवक सुमित झुंजारराव यांनी आपल्या भाषणात ही केवळ कंपनी नसून एक कुटुंब असल्याचे सांगितले. चांगले दिवस असोत किंवा संघर्षाचे, आपण सर्वांनी एकत्र राहून प्रत्येक टप्पा पार केला आहे.

आजही आपण कुटुंबाप्रमाणे एकत्र आहोत, हीच मोठी गोष्ट आहे, असे ते म्हणाले. तसेच, भविष्यात कोणतीही मदत लागल्यास आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ती करण्यासाठी आपण सदैव तत्पर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमामुळे माजी कर्मचाऱ्यांमध्ये एकोप्याची भावना अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने महापालिकेत अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात (३० एप्रिल) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## स्टीलच्या पार्टची चोरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अज्ञात आरोपीने दीड कोटी रुपयांच्या स्टीलचे चाइल्ड पार्ट्स चोरून नेल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात २८ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हे

फिर्यादी काम करत असलेला टाटा प्रॉडक्ट लिमिटेड कंपनीचे पलावा डोंबिवली या ठिकाणी शिळफाटा ते कल्याण असे रेल्वे लाईनच्या वर ब्रिजच्या कामासाठी लागणारे दीड कोटी रुपयांचे स्टीलचे चाईल्ड पार्ट हे पनवेल येथील करंजाडे सेक्टर वन मधील रेल्वेच्या जागेतील ओपन स्टोअर्स मध्ये ठेवले आहेत. हे स्टील चाइल्ड पार्ट्स अज्ञात इसमाने चोरून नेले.


## संपादकीय

# ‘रायगड’ जागा झाला आहे

इतिहास आणि तंत्रज्ञान यांच्या संगमावर उभ्या असलेल्या रायगड जिल्ह्याच्या ऐतिहासिक भूमीचे महत्व ओळखून ज्या दूरदृष्टीने छत्रपती शिवरायांनी या भूमीला हिंदवी स्वराज्याच्या राजधानीचा बहुमान दिला, तीच दूरदृष्टी आता आधुनिक अर्थव्यवस्थेत रायगड जिल्ह्यात प्रतिबिंबित होत आहे, हे या जिल्ह्याचे भाग्य म्हणावे लागेल.

**महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येस रायगड जिल्ह्याच्या विकासयात्रेचा नवा आणि महत्वाचा टप्पा निर्माण करून राज्याच्या प्रगतीच्या वाटचालीचे नेतृत्व करण्याची संधी रायगड जिल्ह्यास देणारा ऐतिहासिक टप्पा गाठल्याबद्दल महाराष्ट्रातील महायुती सरकार अभिनंदनास पात्र आहे. योग्य नियोजन आणि शाश्वत विकासाची जोड मिळाली, तर रायगड जिल्हा केवळ महाराष्ट्राचाच नव्हे, तर देशाचा सर्वात मोठा आर्थिक कणा म्हणून ओळखला जाईल, असे संकेत देणाऱ्या अनेक प्रकल्पांना वेग देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या जिल्ह्याच्या नेतृत्वक्षमतेस मान्यता दिली आहे. जिल्ह्यातील कुंभे व अंबा उदंचन जलविद्युत प्रकल्पांच्या स्थापित क्षमतावाढीच्या महत्वाकांक्षी टप्प्याची वाटचाल महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येस सुरू झाली हा केवळ योगायोग नसून राज्याच्या विकासात रायगड जिल्ह्याच्या योगदानास मिळालेली पसंतीची पावती आहे. कुंभे व अंबा उदंचन जलविद्युत प्रकल्पाच्या सुधारित सामंजस्य करारामुळे या प्रकल्पाची जलविद्युत निर्मिती क्षमता १८०० मेगावॅटवरून २६०० मेगावॅटपर्यंत वाढणार असल्याने, महाराष्ट्रास विकासाच्या तेजाने उजळण्याच्या महत्वाकांक्षेला रायगड जिल्ह्याची साथ महत्वाची ठरणार आहे. महाराष्ट्राच्या नकाशावर रायगड जिल्ह्याचे स्थान नेहमीच वैशिष्ट्यपूर्ण राहिले आहे. एकेकाळी केवळ 'स्वराज्याची राजधानी' असलेल्या या जिल्ह्याने कात टाकली आहे. आता रायगड हा केवळ ऐतिहासिक वारसा राहिलेला नाही, तर महाराष्ट्राच्या, किंबहुना भारताच्या विकासाची दिशा ठरवणारे 'आर्थिक इंजिन' म्हणून उदयास येत आहे. रायगडातील परिवर्तनकारी 'अटल सेतू' आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे या परिसरास जागतिक दर्जाची दळणवळण क्षमता लाभली आहे, आणि विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर आणि मुंबई-पुणे मिसिंग लिंकमुळे हा जिल्हा राज्याच्या दोन मोठ्या आर्थिक केंद्रांना जोडणारा जलद दुवा ठरला आहे. सरकारने मंजूर केलेल्या विशाल गुंतवणुकीचा ओघदेखील प्राधान्याने रायगडाकडेच वळला आहे. पाताळगंगा, महाड आणि रोहा यांसारख्या जुन्या औद्योगिक वसाहतींचा चेहरामोहरा बदलून येथे 'बल्क ड्रग पार्क' आणि 'डेटा सेंटर्स' सारखी आधुनिक क्षेत्रे विकसित होत आहेत. जेएनपीटी बंदराची वाढती क्षमता आणि नियोजित वाढवण बंदर प्रकल्पामुळे हा जिल्हा 'लॉजिस्टिक्स हब' म्हणून स्वतःचे स्थान पक्के करत आहे. रायगडला लाभलेला विस्तीर्ण समुद्रकिनारा आणि माथेरानसारखी थंड हवेची ठिकाणे यामुळे पर्यटन क्षेत्रात मोठी उलाढाल होत आहे. अलिबाग हे आता केवळ सहलीचे ठिकाण न राहता 'रिअल इस्टेट' आणि 'सर्व्हिस सेक्टर'चे मोठे केंद्र बनले आहे. जिल्ह्यातील नियोजनबद्ध नागरीकरणातून या जिल्ह्याला भविष्यातील एक सुसज्ञ महानगराचे रूप येत आहे. वेगवान नागरीकरण आणि औद्योगिक वाढ यामुळे पर्यावरणाचा समतोल राखणे हे मोठे आव्हान आहे. येथील स्थानिक तरुणांना या औद्योगिक क्रांतीचा थेट फायदा मिळावा यासाठी त्यांच्या कौशल्य विकासावर भर देणे ही आता या जिल्ह्याची जबाबदारी आहे. ती यशस्वीपणे पार पाडली, की रायगड जिल्हा महाराष्ट्राच्या विकासाचे आदर्श मॉडेल म्हणून विकसित होईल. महायुती सरकारने विकासाची जबाबदारी घेतली आहे. आता जिल्ह्याने त्यासाठी सज्ज व्हावयास हवे.**

# पहेलगाम सावरतंय अन बहरतंय...!



भारतातील पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून गणल्या जाणाऱ्या काश्मीर खोऱ्यातील पहेलगाममध्ये पाकिस्तानने दहशतवादी हल्ला करून २७ कुटुंबीयांवर क्रुरतेने परिसिमा करून कायमचे संपवले. धर्म विचारून गोळ्या झाडल्या. जगभरात या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. संपूर्ण देश या अमानवी कृतीचा कळस गाठणाऱ्या घटनेने हादरून गेला, परंतु शासनाने वेळीच सर्व उपाययोजना करून पहेलगाम व आजूबाजूच्या पर्यटन खोऱ्यात सुरक्षेचे जाळे विणून या भागात पर्यटन पुन्हा मूळ पदावर कसे येईल यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येत आहेत.

या भागाला भेट देण्यासाठी पनवेल तालुक्यातील पनवेल पत्रकार विकास मंचाचे चे अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी एक अभ्यास दौरा आयोजित करून पहेलगांमधील स्थानिक पत्रकार बांधव, हॉटेल व्यवसायिक,अन्य व्यवसायिक, घोडसवारी करणारे तसेच छोटे मोठे व्यवसाय करून आपले उदरनिर्वाह करणाऱ्याशि थेट संवाद साधून येथील सद्यस्थितीची पाहणी केली. केंद्र सरकारने काश्मीर खोऱ्यातील पहलगाममध्ये आता सुरक्षा योजनेची विशेष अंमलबजावणी करून व येथील येणाऱ्या पर्यटकांच्या जीविताचे रक्षण करण्याची हमी घेतली असल्याने येथे आता पर्यटक थोड्या फार प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे येथील पहेलगाम व त्याचा आजूबाजूचा परिसर पुन्हा आपल्या भरताना दिसून येत आहे.



गतवर्षी झालेल्या पहिला नंतरच्या निर्माण झालेल्या सामाजिक जीवनावरती सद्यस्थितीचा परिस्थिती कशी आहे याचा आढावा घेण्यासाठी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने एक अभ्यास दौरा आयोजित केला होता. यात पनवेलमधील ११ पत्रकार सदस्य सहभागी झाले होते. पहेलगाम खोऱ्यामधील विविध ठिकाणी पत्रकार विकास मंचच्या सदस्यांनी पर्यटनस्थळी भेटी देऊन येथील स्थानिकांशी चर्चा केल्या. या खोऱ्यातील आरु व्हॅली व बेताब व्हॅली पुन्हा पर्यटकांनी गजबजू लागले आहेत. भारतीय जवानांच्या सुरक्षेच्या उपाययोजनेमुळे पर्यटक आनंद लुटत असताना दिसून येत आहे. येथील आता जनजीवन मूळ पदावर येत आहे. थोडा वेळ जाईल, परंतु केंद्र शासनाच्या विविध उपाय योजना येथे निश्चितच फलदायी होत असल्याच्या दिसून येत आहेत.

नैसर्गिक साधन संपत्तीने परिपूर्ण अन संपन्न असलेलं काश्मीर खोऱ्यातील पहेलगाम या पर्यटन स्थळाला निसर्गाने भरभरून दान दिलेल आहे. एका बाजूला खळखळत्या स्वच्छ थंडगार पाण्याच्या कायम वाहणारी नदी उंच उंच हिरवेगार शालिनी नटलेले डोंगर एकीकडे बर्फाच्या चादरीने लपेटलेले डोंगराचे कडे हे नवे निसर्ग सौंदर्य ही खरोखरच एक दिन अनोखी देणगी लाभलेलं पहेलगाम पर्यटन स्थळ आहे. दहशतवादी हल्ल्याच्या कटू आठवणी आजही पहेलगामच्या स्थानिकांमध्ये दिसून येत आहेत.

एक वर्ष उलटलं तरी दहशतीच्या आठवणी मात्र ताज्या अन जिवंत आहेत स्थानिकांवर झालेल्या दहश हल्ल्याच्या जखमा आजही भरभरून वाहत आहेत. तब्बल अडीच हजार घोडसवारी, २००० पेक्षा जास्त टुरिस्ट गाड्या चालवणाऱ्यांचं जीवन या पर्यटनावर अवलंबून आहे. ते पूर्व पदावर यायला अजून बराच काळ लागणार आहे. आत्मघाती हल्ल्यानंतर पहिलाच जनजीवन पूर्णपणे बदलून गेल आहे. दहशतवाद्यांच्या भीतीवर मात करून पुन्हा पहेलगाम पूर्वीसारखं गजबजून सुवर्णयोग निर्माण होईल का.

पर्यटनावरच अवलंबून असलेलं पहेलगाम हल्ल्यानंतर आर्थिक दिवंचनेत अडकून गेला आहे.पर्यटकच फारसे येत नसल्यामुळे एक वर्षभरामध्ये हॉटेल व्यवसायावरही त्याचा आर्थिकदृष्ट्या मोठा परिणाम झाल्याचे सुद्धा हॉटेल व्यवसायिक सांगत आहेत.शाल, अक्रोड, बदाम अन्य सुकामेवा विकणाऱ्या बाजारपेठेवरील विपरीत परिणाम झालेला दिसून येत आहे. पर्यटकांचा राबता कमी झाल्यामुळे टुरिस्ट गाड्यांचा व्यवसाय करणाऱ्यांवरही वर्षभरात उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. या ठिकाणी फळ विक्री करून उदरनिर्वाह करणाऱ्यांना आता जीवन जगण्यासाठी अन्य ठिकाणी जाऊन रोजगार मिळवावा लागत आहे. पर्यटकच कमी प्रमाणात येऊ लागल्याने येथील स्थानिकांना मात्र जगण्यासाठी खूप मोठा संघर्ष करावा लागत आहे.

आता केंद्र सरकारच्या विशेष विविध पर्यटकांशी निगडित उपाययोजना या ठिकाणी आता केल्या जात आहेत. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी विशेष सुरक्षा यंत्रणा या ठिकाणी तैनात केल्याचे दिसून येत आहे. जागोजाग बंदूकधारी जवान भारतीय सैन्य दल डोळ्यात तेल टाकून पर्यटकांच्या सुरक्षेची काळजी घेताना दिसून येत आले आहे. आता जनजीवन हे मूळ पूर्वपदावर आले असून पर्यटकांनी कोणतीही मनात भीती बाळगू नये.केंद्रशासन पर्यटकांच्या सुरक्षेची पुरेपूर काळजी घेत आहे. भारतातील आपल्या पृथ्वीवरील स्वर्गाला निश्चितच पर्यटकांनी भेट देऊन येथील पर्यटन व्यवसायाला निश्चित चालना देण्याच्या आवाहन येथील स्थानिक करीत आहेत. पहेलगाम मधील येणाऱ्या पर्यटकांना येथील स्थानिक आपला देव मानत आहेत.आम्हाला व्यवसाय द्या, आमच्याकडून वस्तू खरेदी करा अशी याचना करता नाही ते दिसत आहेत. अगर आप नही आओगे तो हम कैसे जियेंगे अशी आर्त साद ते देताना दिसून येत आहे.

**-दीपक घोसाळकर,**
पत्रकार, कळंबोली



## बदलते तंत्रज्ञान

# एम्पियर मॅग्नस निओ इलेक्ट्रिक स्कूटर लॉन्च

ग्रीव्हस इलेक्ट्रिक मोबिलिटीने भारतात आपली अपडेटेड इलेक्ट्रिक स्कूटर एम्पियर मॅग्नस निओ लॉन्च केली आहे. कंपनीने नवीन मॉडेलमध्ये मोठे बदल करण्याऐवजी दैनंदिन वापर सुधारण्यासाठी ते तयार केले आहे.कंपनीचा दावा आहे की, पूर्ण चार्ज केल्यावर ई-स्कूटर ११८ किमीची रेंज देईल आणि तिचा टॉप स्पीड ६५ किमी प्रतितास आहे.दिल्लीमध्ये याची एक्स-शोरूम किंमत ८६,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. कंपनीने मॅग्नस निओच्या एर्गोनॉमिक्समध्ये काही महत्त्वाचे बदल केले आहेत, जेणेकरून रायडरला कमी थकवा जाणवेल.



सीट आणि चाके: स्कूटरमध्ये आरामदायक लांबच्या प्रवासासाठी सीटची पुनर्रचना करण्यात आली आहे. वजन: स्कूटरचे एकूण वजन १०३ किलो आहे. हलके वजन असल्यामुळे ट्रॅफिकमध्ये ते हाताळणे आणि पार्क करणे खूप सोपे होते.

कार्यक्षमता: सिंगल चार्जवर मिळेल ११८km ची रेंज
एम्पियर मॅग्नस निओमध्ये परफॉर्मन्ससाठी २.३kWh चा LFP (लिथियम फेरस फॉस्फेट) बॅटरी पॅक देण्यात आला आहे. कंपनीनुसार, हा स्कूटर इंडियन ड्रायव्हिंग सायकल (IDC) अंतर्गत ११८ किमीची रेंज देतो.

तथापि, इको मोडमध्ये याची रिअल वर्ल्ड रेंज ८५-९० किमीच्या जवळपास आहे. स्कूटरचा टॉप स्पीड ६५ किमी प्रति तास आहे. ऑफ-बोर्ड चार्जरच्या मदतीने याला ० ते ८०% पर्यंत चार्ज होण्यासाठी सुमारे ५ तास लागतात.

हार्डवेअर आणि फीचर्स: २२ लीटरची अंडर-सीट स्टोरेज
मॅग्नस निओमध्ये मूलभूत पण आवश्यक फीचर्सचा चांगला समन्वय पाहायला मिळतो. एम्पियरने याच्या व्हील आणि मोटर कॉन्फिगरेशनमध्येही सुधारणा केली आहे, सस्पेन्शन आणि ब्रेक: उत्तम राइड क्वालिटीसाठी यात टेलिस्कोपिक फ्रंट फोर्क्स आणि मागील बाजूस मोनोशॉक सस्पेन्शन देण्यात आले आहे. जे जुन्या ड्युअल-फ्रेम चेसिसवर आधारित आहे. ब्रेकिंगसाठी दोन्ही चाकांवर ड्रम ब्रेक मिळतात.स्मार्ट फीचर्स: स्कूटरमध्ये ३.५-इंचचा एलसीडी इन्स्ट्रुमेंट कन्सोल, ऑल-एलईडी लाइटिंग सेटअप आणि मोबाईल चार्ज करण्यासाठी यूएसबी पोर्ट देण्यात आले आहे.

# महाराष्ट्र राज्य दिन स्थापना

१ मे हा महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन. याच दिवशी 1960 साली स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा आज 66वा वर्धापन दिन आहे. हा दिवस पूर्वीच्या मुंबई संस्थानातून मराठी भाषिक राज्याच्या निर्मितीच्या स्मरणार्थ साजरा केला जातो.. यशवंतराव चव्हाण यांच्याकडे महाराष्ट्राच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविली गेली. तसा महाराष्ट्राचा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा फार मोठा आहे. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत आणि त्यानंतरही देशाच्या प्रत्येक विधायक उपक्रमात महाराष्ट्राने हिरीरीने सहभाग घेतला आहे.

प्राचीन संस्कृतीचा वारसा सांभाळतानाच देशाच्या विकासातही योगदान दिले आहे. महाराष्ट्राचा धार्मिक सुधारणांचा, सामाजिक सुधारणांचा इतिहास प्रेरणादायी आहे. राज्याचे विविधांगी भावविश्व थक्क करणारे आहे.महाराष्ट्र ही संत-महंत, ऋषी-मुनींची जशी भूमी आहे तशीच शूरवीरांचीही आहे. या भूमीला पराक्रमाची, त्यागाची, देशप्रेमाची परंपरा लाभली आहे. छत्रपती शिवरायांनी सर्वधर्मसमभावाचे पालन केले. हिंदवी स्वराज्य, रयतेचे राज्य स्थापन केले. छत्रपती शिवरायांपासून प्रेरणा घेऊन




## निमित्त

महाराष्ट्रातील क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, उमाजी नाईक, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, राजगुरु, नाना पाटील यासारख्या अनेक देशभक्तांनी इंग्रजांविरूद्ध लढा उभारला. अतोनात कष्ट, यातना सहन केल्या. त्यासाठी प्राणांचीही पर्वा केली नाही.

संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वार, संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत तुकाराम, समर्थ रामदास, संत गोरा कुंभार, संत सावतामाळी, संत नरहरी सोनार, सेना महाराज, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत कान्होपात्रा, संत एकनाथ, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशा संतांच्या मांदियाळीने महाराष्ट्र मनाचे संवर्धन, पोषण करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक विचार रुजविण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी अण्णासाहेब कर्वे, कर्मवीर शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या समाजसुधारकांनी समाज प्रबोधनासाठी अपार कष्ट घेतले.

देशाच्या स्वातंत्र्याचे स्वप्न पहात असतानाच द्विभाषिक राज्याचे एक शक्तीशाली राज्य व्हावे यासाठी लोकनेते, बुद्धीवादी, लेखक, पत्रकार यांनी मराठी भाषिक प्रदेशएकत्र आणण्याची कल्पना मांडली. एस. एम. जोशी, आचार्य प्र. के.अत्रे, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे यांच्यासह अनेक जण नवमहाराष्ट्रासाठी एक झाले आणि संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार केले. महाराष्ट्राने आतापर्यंत साहित्य, कला, शिक्षण, क्रीडा, संस्कृती, नाट्य, चित्रपट, संगीत, सहकार, कृषी, उद्योग, संगणक, विज्ञान अशा विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. आपल्या पूर्वजांनी दिलेल्या योगदानाची जाणीव ठेवत वैभवशाली इतिहास जपत प्रगतीची नवनवी शिखरे पादाक्रांत करण्याचा निर्धारआपण करावयास हवा.

(साभार : विकासपीडिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रक्तशर्करेच्या नियंत्रणासाठी आहारात करा ‘यांचा’ समावेश

मधुमेह हा एक जुनाट चयापचयासंबंधीचा आजार आहे. त्यात रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते किंवा कमी होते. त्यामुळे कालांतराने हृदय, रक्तवाहिन्या, डोळे, मूत्रपिंड व नसा यांना गंभीर नुकसान पोहचते. आनुवंशिक असलेल्या मधुमेहाची अनेक कारणे आहेत. या आजारपणात खाण्यापिण्याची काळजी घेण्याचा सल्ला दिला जातो. मधुमेह झाल्यानंतर काही पदार्थ खाणे कटाक्षाने टाळावे लागते आणि काही पदार्थांचा आहारात समावेश करण्याचा सल्ला दिला जातो. रक्तातील साखर स्थिर ठेवण्यासाठी तुमच्या दिवसाची सुरुवात कोणत्या पदार्थांनी करावी याच विषयावर हंग्री कोआला येथील ज्येष्ठ आहारतज्ज्ञ इप्सिता चक्रवर्ती यांनी माहिती दिली.



* ओट्स : मधुमेहाच्या रुग्णांना अशा पदार्थांचे सेवन करावे लागते; ज्यात भरपूर फायबर असते आणि भरपूर पोषक असतात, तसेच साखर आणि चरबीयुक्त पदार्थांपासून दूर राहणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत अनेक आरोग्य तज्ज्ञ मधुमेही लोकांना ओट्स खाण्याचा सल्ला देतात. ओट्समध्ये कॅलरीज कमी आणि फायबर भरपूर असते. ओट्सचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्यामुळे त्याच्या सेवनाने रक्तातील साखरेची पातळी वाढत नाही. नाश्त्यात ओट्स खाल्ल्यास मधुमेहींना दिवसभर ऊर्जा मिळते. ओट्स खाल्ल्यानंतर खूप वेळ भूक लागत नाही. स्वाभाविकत: जास्त खाल्ले जाण्यास प्रतिबंध होतो. ओट्समध्ये कॅलरीज नसतात आणि त्यामुळे पचनशक्ती चांगली राहते.

* बार्ली : मधुमेह किंवा प्री-डायबेटिक लोकांसाठी बार्ली खूप फायदेशीर मानली गेली आहे. ओट्सप्रमाणेच बार्ली ही बीटा-ग्लुकन सामग्रीमुळे रक्तातील साखर स्थिर करण्यासाठी प्रभावी आहे. त्यातील फायबर इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते. रक्तातील साखरेची पातळी कमी करते.

* शेंगा : मसूर आणि काळे बीन्स यांसारखे पदार्थ फायबर आणि प्रथिनांनी समृद्ध असतात. हे दोन्ही पदार्थ ग्लुकोजचे शोषण कमी करणे आणि रक्तातील साखरेची जलद वाढ रोखणे यासाठी महत्त्वपूर्ण असतात.

* नट : बदाम, अक्रोड व इतर शेंगदाणे पचनशक्ती सुधारणे आणि रक्तातील साखरेची पातळी स्थिर राखणे यासाठी एकत्रितरीत्या काम करतात.

* पालेभाज्या : पालक व इतर पालेभाज्यांमध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण कमी आणि फायबरचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

# तळा पाणीपुरवठा योजनेबाबत जनहित याचिका दाखल करण्याची भाजपची तयारी

**तळा : प्रतिनिधी**

तळा नगरपंचायत क्षेत्रातील तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर स्थानिक राजकारण तापले असून भारतीय जनता पक्षाने या प्रकरणी न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे.



तळा शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या १३ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी सुरू असली तरी ती अद्याप पूर्णत्वास गेलेली नाही. परिणामी नागरिकांना नियमित व शुद्ध पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. शहरातील काही भागांत पाईपलाईन, जलसाठा व वितरण व्यवस्थेत गंभीर त्रुटी असल्याचे समोर येत आहे. भाजप तालुका अध्यक्ष ॲड. निलेश रातवडकर यांनी पाणीप्रश्न हा जनतेच्या मूलभूत हक्कांशी संबंधित असल्याने सांगत नाराजी व्यक्त केली आहे. कामाची मुदत संपूनही प्रकल्प पूर्ण झालेला नाही. नगरपंचायत प्रशासन व सत्ताधारी पक्षाकडून याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे न्यायालयीन मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रस्तावित जनहित याचिकेत पाणीपुरवठा योजनेची चौकशी, निधी व कामाच्या गुणवत्तेची तपासणी, दोषींवर कारवाई तसेच नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याची मागणी करण्यात येणार आहे. दरम्यान, पाणीटंचाईमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असून महिलांवर व शेतकरीवर्गाला याचा त्रास सहन करावा लागत आहे तसेच काही शासकीय कर्मचाऱ्यांना इतर तालुक्यात राहण्यास भाग पडत आहे.

> **कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर लवकरच अधिकृतपणे याचिका दाखल केली जाणार आहे.**
> **–ॲड.निलेश रातवडकर**
> भाजप तळा तालुकाध्यक्ष

# बोरघाटातील डेंजर झोन होणार इतिहासजमा!

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाट 'मृत्यूचा घाट' बनला होता. आडोशी बोगदा, अंडा पॉंइट, बॅटरी हिल, खोपोली बायपास ते ढेकू फूडमॉलपर्यंतचा तीन किमीचा रस्ता असे अपघातांचे डेंजर स्पॉट ठरले होते. येथून प्रवास करताना वाहन चालक तसेच प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असे. परंतु १ मे रोजी या मार्गाला पर्याय ठरणारा मिसिंग लिंक रस्ता सुरू होत असल्याने या ठिकाणी होणारे सततचे अपघात, वाहतूक कोंडी यांवर कायमस्वरूपी तोडगा निघाला असून या मार्गाने मुंबई पुणे ही महानगरे जवळ येऊन हे अंतर ११ किमी ने कमी होत अर्धा तासाने वेळ वाचणार आहे. खोपोली बायपास जवळ वर्षभरात १६ अपघात झाले असून १५जणांना आपला जीव गमवावा लागला, तर ६७ वाहनांचे नुकसान झाले ६१जण जायबंदी झाले होते



मुंबई–पुणे एक्स्प्रेस वेवरील अवजड वाहने लोणावळा, खंडाळा येथून बोरघाटातील उतारावरूनजात असताना चालकांना सारखा ब्रेक मारावा लागतो. तब्बल दहा–बारा किमीच्या प्रवासात वाहनांचे लायनर गरम झाल्याने ब्रेक फेल होतात, तर खोपोली बायपास नवीन मार्गावरील अंडरपास बोगदा व तिव्र उतारांवरून गाड्या चालवताना वाहनचालकांच्या मनात अनेकदा गोंधळ निर्माण होत या ठिकाणी अपघात प्रवण क्षेत्र निर्माण झाले होते

३ मार्च २६ रोजी कंटेनरने पाच वाहनांना धडक दिली असता इनोव्हा कार मधील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला तर टाटा टिगारो कार मधील चार जण जखमी झाले होते. २१ एप्रिल रोजी बॅटरी पॉईंटजवळ पर्यटकांच्या इनोव्हा गाडीला झालेल्या अपघातात तीन ठार. १६ जानेवारी अमृतांजन पुलाजवळ कंटेनर उलटून तीन जखमी झाले होते.

बोरघाटातील अमृतांजन पूल ते फूडमॉल या १५ किलोमीटर अंतरावर स्कॅनर बसवण्यात आले असून, लेन शिस्त, वेग मर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांवर कारवाई, रंबल स्टिप्स, स्पिड ब्रेकर, दिशादर्शक फलक बसवून ही अपघात थांबत नव्हते. परंतु मिसिंग लिंक सुरू झाल्याने या मार्गावर वाहणांची संख्या कमी होऊन, फक्त हलकी वाहन कार जाणार असल्याने वाहतूक कोंडी तसेच अपघातांमध्ये घट होईल अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.



# माथेरान पर्यटनस्थळी स्वच्छता मोहीम

**माथेरान : बातमीदार**

पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान मधील विविध ठिकाणी प्लास्टिक कचऱ्याचे साम्राज्य इतरस्त्र पसरलेले असून येथील पर्यावरणाचा ऱ्हास होण्यासाठी कारणीभूत ठरत असलेल्या प्लास्टिक बाटल्या जंगल आणि पॉईंट परिसरात विखुरलेल्या दिसत आहेत.माझं गाव माझं पर्यावरण या अनुषंगाने नेहमीप्रमाणे येथील स्वच्छता दूत राकेश कोकळे यांनी आपल्या मित्र परिवारासोबत काळोखी परिसरातील जंगल भागात जवळपास २५ ते ३० गोणी प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करून नगरपालिकेच्या ताब्यात दिले.

सुप्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानच्या जंगल भागाचा, हिरव्यागार वनराईचा प्लास्टिक कचऱ्यामुळे ऱ्हास होत आहे. येथील स्वच्छता दूत राकेश कोकळे यांनी मागील अनेक वर्षां पासून पॉईंट परिसरातील व जंगल भागातील प्लास्टिक गोळा करण्याचे महत्वाचे काम हाती घेतले आहे. त्यांच्या सर्व मित्रपरिवाराला या ठिकाणी जेव्हा कधी वेळ मिळेल तेव्हा ही मंडळी सर्व परिसरातील प्लास्टिक कचरा गोळा करीत असतात.यावेळी देखील त्यांनी रेल्वे लाईनच्या जवळ काळोखी या जंगल परीसरातील प्लस्टिक कचऱ्याचे संकलन केले.

# मुंबई–पुणे महामार्गालगतची होर्डिंग्ज आयआरबीकडून जमीनदोस्त

**चौक : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वरती पावलोपावली मोठ मोठे होर्डिंग्ज उभे होते, लोकप्रीय दैनिक राम प्रहर याने यावर आवाज उठवला होता, दोन दिवसां पासून ही होर्डिंग्ज जमीनदोस्त करण्याची सुरुवात आय.आर. बी. यांनी केली असून, रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला असून भाडे वसुली बंद झाल्याची जोरदार चर्चा सुरू आहे.



मुंबई–पुणे रस्त्यावर दोन्ही बाजूला मोठमोठी होर्डिंग्ज उभी राहिली होती, रात्री अपरात्री देखील उभी केली जात होती यावर आय.आर.बी. हे रस्ता देखभाल दुरुस्ती करणारी यंत्रणा, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनीही दुर्लक्ष केल्याचे लक्षात आल्यावर दैनिक राम प्रहरच्या माध्यमातून आवाज उठवण्यात आल्यावर आता आय.आर.बी. यांनी तोडक कारवाई सुरू केली आहे.याकडे स्थानिक पदाधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत होते, असा आरोप करण्यात येत आहे. अनेकांनी या होर्डिंग्जचे भाडे आपल्या खिशात घातल्याचे बोलले जात आहे.

दोन वर्षांपूर्वी चौक हद्दीत कर्जत फाटा येथे मोठे होर्डिंग्ज पडले होते, सुदैवाने जिवीत हानी झाली नाही, याची दखल तत्कालीन रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी घेतली होती.काही चुकीच्या जाहिरातींमुळे मानसिक ताण वाढत जाऊन चालकाचे नियंत्रण बिघडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पुणे, मुंबई घाटकोपर सारख्या घटना घडू शकतात, हे होर्डिंग्ज संरचनात्मक दृष्ट्या कमकुवत असू शकतात आणि सार्वजनिक आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतात.

जीवित व मालमत्तेची हानी, वादळ किंवा कमकुवत बांधकामामुळे होर्डिंग्ज पडून गंभीर अपघात होऊ शकतात, ज्यात जीवितहानी देखील होऊ शकते. मोठ्या होर्डिंग्जमुळे चालकांचे लक्ष विचलित होते, ज्यामुळे रस्ते अपघातांचा धोका वाढत आहे,

रस्त्याच्या व परिसराच्या सौंदर्यात अडथळा निर्माण होत असून नैसर्गिक दृश्ये झाकली जाऊ लागली आहे. होर्डिंग्ज साठी वापरलेले साहित्य याचा दर्जा माहित नसतो,अनेकदा होर्डिंग्जवर आक्षेपार्ह किंवा दिशाभूल करणाऱ्या जाहिराती असतात, ज्याचा नागरिकांच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम होत आहे. रस्त्याच्या

सुरक्षिततेच्या नियमांचे पालन न केल्यास हे होर्डिंग्ज भविष्यात मोठे धोके बनू शकतात.राम प्रहर च्या वृत्ताने खळबळ उडाली होती. या रस्त्याची मालकी असणारे आणि रस्त्याची देखभाल दुरुस्ती करणाऱ्या आय. आर. बी. यंत्रणेने त्वरीत लक्ष देऊन सर्व हॉर्डिंग वर तोडक कारवाई सुरू केली असून नागरिक यांच्यात समाधान व्यक्त होत आहे.

# अलिबागमध्ये गीत जगदीश कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

मराठी गीतसृष्टीतील अजरामर गीतांचे शब्दप्रभू स्वर्गीय जगदीश खेबुडकर यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी स्व. जगदीश खेबुडकर फाउंडेशनच्या वतीने रविवारी (दि.३) सायंकाळी ६.०० वाजता अलिबाग येथील पीएनपी नाट्यगृहात 'गीत जगदीश' हा कार्यक्रम हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

स्व. जगदीश खेबुडकर फाउंडेशनचे अध्यक्ष मुकुल जगदीश खेबुडकर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी माधवी मुकुल खेबुडकर,मुकुंद सुधाकर तारदाळकर,दीपा मुकुंद तारदाळकर, शारदा धुळप उपस्थित होते. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असून, आसनव्यवस्था 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' असणार आहे.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय पनवेल**
जुना ठाणा नाका, साई नगर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६.
दुरध्वनी क्र.:/फॅक्स क्र.:०२२–२७४५२३९९
E mail : tahsilpanvel@gmail.com

क्र.मशा/प्रशा१/मृत्यू नोंद दावा क्र. २९/२०२५ दिनांक : २९/०४/२०२६

**"नोटीस"**

**विषय:– उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.**

**संदर्भ :– अर्जदार यांचा दि.१९/११/२०२५ रोजीचा अर्ज.**

उपरोक्त विषयाकामी अर्जदार **श्री. नवनाथ गंगाराम पाटील, रा.करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड** यांनी कै. बाबीबाई जोमा मुंढकर यांची उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी तहसिलदार तथा, कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

तथापी, उक्त प्रकरणी सदर मृत्यू नोंदीस आपली कोणतीही हरकत असल्यास सदरची हरकत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत सादर करावी. नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसा नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/–
(राजश्री जोगी)
नायब तहसिलदार पनवेल,
तथा कार्यकारी दंडाधिकारी, पनवेल

# शिवसेना मुरूड शहर अध्यक्षपदी दर्शन काळबेरे



**मुरुड : प्रतिनिधी**

शिवसेना (शिंदे गट) मुरुड शहरप्रमुखपदी दर्शन काळबेरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आमदार महेंद्र दळवी यांच्या राजमळा येथील निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात काळबेरे यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

या प्रसंगी मावळचे खासदार श्रीरंग बारणे, अलिबाग–मुरुडचे आमदार महेंद्र दळवी, जिल्हाप्रमुख राजा केणी, युवा सेना जिल्हाप्रमुख संजय म्हात्रे तसेच तालुका प्रमुख निलेश घाटवळ यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी काळबेरे यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दर्शन काळबेरे यांच्यावर पक्षाने मुरुड शहरातील संघटन बळकट करण्याची महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. आगामी काळात पक्षाच्या ध्येयधोरणांची अंमलबजावणी करत स्थानिक पातळीवर जनतेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले जाईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

दर्शन काळबेरे यांनीही पक्ष नेतृत्वाच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे सांगितले. मुरुड शहरात शिवसेनेची ताकद वाढवण्यासाठी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटन मजबूत करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.गेली अनेक वर्ष दर्शन काळबेरे हे शिवसेनेचे प्रामाणिक काम करीत आहेत .

*वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी* राम प्रहर

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000038348** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-29/ 2025-2026.** RFx e-tender for supply of manpower with two wheeler for ground patrolling of underground cable route of 220kV Timbermart-Khandeshwar I & II line for finding of any digging/ excavation/ construction activity by various utilities and providing & fixing of route marker at 50 meters on underground cable route of 220kV Timbermart Khandeshwar I & II line under EHV Lines S/Dn. Panvel -1 under EHV O&M Division Panvel....4th call. **Tender amount Rs. 11,41,126/-, EMD amount Rs. 11,411/-** |
| 2 | Online Downloading the RFx . | **30.04.2026, 18:00 Hrs. to 10.05.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 10.05.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **11.05.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**Executive Engineer**
**E.H.V.(O&M) Dn. Panvel**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित **मालक १. प्रवीण केशव बडेकर २. वैशाली पंकज पाटील ३. प्रकाश हरिबा पवार** यांच्या हिश्यातील मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकत असून, त्यांनी सदर मिळकतीचे खरेदीखत करून **आमचे आशील यांना विकत देण्याचे ठरविले आहे.** तरी सदर मिळकतीची प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**–: मिळकतीचे वर्णन :–**

मौजे : वाशिवली, तालुका – खालापूर, जिल्हा – रायगड.

| अ.क्र. | सर्व्हे/गट क्र. | एकूण क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी) | आकार |
|---|---|---|---|
| १ | ९/३ | ०–२९–३० | ०.२५ |

**एकूण क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी.) ०–२९–३०**

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे साठेकरार व खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबादल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

सही/–
**ॲड. आकाश ज्ञानेश्वर कांबळे**
कार्यालयीन पत्ता– आप्पा गोरे संकुल, गाळा क्र. १७, बँक ऑफ इंडिया एटीएमच्या बाजूला, मु. पो. तालुका खालापूर, जिल्हा रायगड ४१०२०२
मोबाईल नं. ८१४९३७१५१४

# पोलादपूरमध्ये आपली माती आपली माणसं संघटनेचे कचराविरोधी आंदोलन अखेर मागे

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पंधरा दिवसात दुसऱ्यांदा पोलादपूर तालुक्यातील 'आपली माती आपली माणसं' सामाजिक संघटनेने सावित्री नदी पात्रातील कचरा विरोधी आंदोलन आक्रमकपणे यशस्वी केले. याप्रसंगी पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाने पाठिंबा दिला तर मागील वेळेप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक आणि पदाधिकारी आंदोलनात सक्रिय सहभागी होते. या आंदोलनाच्या शेवटी राज्याचे रोजगार हमी योजना फलोत्पादन आणि खार जमीन विकास मंत्री भरतशेठ गोगावले यांनी येत्या चार दिवसात पोलादपूरच्या सावित्री नदी पात्रालगत कचरा नेऊन भस्मसात करण्याची ग्वाही दिल्यानंतर आश्वासनानुसार कृती न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देऊन आंदोलक आपआपल्या घरी परतले.




'आपली माती आपली माणसं' संघटनेचे अध्यक्ष निलेश कोळसकर, हरी पवार तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते संस्थापक राज पार्टे यांच्यासह नगरपंचायतीचे विरोधी गटनेते नगरसेवक दिलीप भागवत व स्वप्निल भुवड तसेच नगरसेविका श्रावणी शहा, माजी सरपंच अमोल भुवड, दीपक उतेकर, पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाचे अध्यक्ष शैलेश पालकर, सचिव सुनील भिलारे, नितीन शेठ, संतोष मोरे, गणेश शेठ यांच्या उपस्थितीत नगरपंचायत पोलादपूर कार्यालयामध्ये घोषणा देत धडक मोर्चा नेला.

यावेळी मंत्री गोगावले यांनी येत्या दोन–चार दिवसात सगळा कचरा पलीकडे नेऊन भस्मसात करण्याची ग्वाही दिली.मंत्री महोदयांकडून देण्यात आलेल्या शब्दांनुसार कारवाई न झाल्यास अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा देऊन परतले.

**पनवेल महानगरपालिका**
तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका, पनवेल | ०२ अशोक झाडे पुनर्रोपण करणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील **प्रभाग क्र. १८ येथील गार्डन हॉटेल सिग्नल, ता. पनवेल** येथील रस्ता अरुंद असल्यामुळे ०२ अशोकाची झाडे रस्ता रुंदीकरणात बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/पुनर्रोपण करणेस परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/०४/२०२६

**सही /–**
**उपायुक्त**
तथा वृक्ष अधिकार
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.१२४/१३५/२०२६

# नवी मुंबईतही दोन भोंदूंना बेड्या

## ◆ काळी जादू व अघोरी विधीच्या नावाखाली महिलेची आर्थिक फसवणूक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत काळी जादू व अघोरी विधीच्या नावाखाली एका महिलेची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी एनआरआय सागरी पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी तातडीने कारवाई करत अवघ्या २४ तासांत दोन आरोपींना अटक केली आहे. अर्जुन चव्हाण उर्फ टनटन बाबा, सागर शिंदे उर्फ एकलहरी बाबा असे अटक करण्यात आलेल्या संशयित व्यक्तींची नावे आहेत.



टनटन आणि एकलहरी बाबाला अटक

यातील पीडित महिलेला काही वारंवार संकटे येत होती. त्या नैराश्यातून नेमकी ती एकलहरी बाबा आणि त्यांचा गुरू टनटन बाबा यांच्या संपर्कात आली. दोघांनी मिळून तुझ्यावर जादुटोणा करणी केली असल्याचे भासवले. तसेच स्वतःला 'बाबा' म्हणून ओळख देणाऱ्या आरोपींनी तिच्यावर काळी जादू झाल्याचा बनाव केला. त्यावर उपाय म्हणून विविध पूजा व विधी करण्याचे aसांगून आरोपींनी तिच्याकडून मोठी रक्कम उकळली. महिलेने रोख रक्कम तसेच ऑनलाइन व्यवहाराद्वारे एकूण सुमारे एक लाख ९० हजार रुपये आरोपींना दिल्याचे समोर आले आहे. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केली.

गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. तपासादरम्यान आरोपी नाशिक परिसरात असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक पोलिसांच्या मदतीने सापळा रचण्यात आला. या कारवाईत अर्जुन भरत चव्हाण (वय २९) सागर शिवाजी शिंदे उर्फ 'एकलहरी बाबा' (वय २४) या दोघांना बुधवारी अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणी भारतीय दंड संहिता तसेच महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू अटक आरोपींकडून आणखी कोणाची फसवणूक झाली आहे का, याचा तपास सुरू असून पोलिसांनी नागरिकांना अशा भोंदू बाबांच्या जाळ्यात न अडकण्याचे आवाहन केले आहे. या घटनेमुळे नवी मुंबईत खळबळ उडाली आहे.

या बाबत अधिक माहिती देताना परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त अमित काळे यांनी सांगितले की, दोन्ही आरोपीचे वय कमी असले तरी बोलण्यात गुंगऊन ठेवतात. आपल्या कडे त्याच्या विरोधात एकच तक्रार प्राप्त झाली आहे, मात्र त्यांनी भोंदूगिरी करत अनेकांची फसवणूक केल्याची शक्यता आहे. या बाबत चौकशी सुरू आहे. या भोंदू बाबाने कोणाची फसवणूक केली असेल तर पोलीस ठाण्यात तक्रार करावी, असे आवाहन ही पोलीस उपायुक्त काळे यांनी केले आहे.

# 'मोरबे धरणातील गाळ काढण्याकडे नवी मुंबई मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष'

**नवी मुंबई : बातमीदार**

एल निनोमुळे कमी पावसाची शक्यता व्यक्त होत असताना नवी मुंबई महानगरपालिकेने संभाव्य पाणीटंचाईचा इशारा दिला आहे, मात्र अधिकृत नोंदीनुसार महानगरपालिकेने आपल्या मुख्य पिण्याच्या पाण्याच्या स्रोत असलेल्या मोरबे धरणाचे गाळ काढण्याचे काम केलेले नसल्याचा आरोप नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी केला आहे.

एप्रिल महिन्यातील महासभेत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी शहरातील उपलब्ध पाणीसाठा ७ ऑगस्ट २०२६ पर्यंतच पुरू शकतो, असे सांगत नागरिकांनी पाणी बचत करावी, असे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, १९०.८९० एमसीएम क्षमतेच्या मोरबे धरणात सध्या ८२.५५७ एमसीएम म्हणजे ४३.२४ टक्के पाणीसाठा आहे. एक महिन्याचा राखीव साठा वगळल्यानंतर प्रत्यक्ष वापरासाठी ५१.९५७ एमसीएम म्हणजे २७.२२ टक्के पाणी उपलब्ध राहते. पर्यावरण कार्यकर्त्यांनी मात्र मोरबे धरणाशी संबंधित अधिक गंभीर मुद्दा उपस्थित केला. गेल्या २५ वर्षांत धरणातील गाळ काढण्यात आलेला नसल्याचा दावा त्यांनी केला. माहिती अधिकार कायद्यान्वये नॅटकनेक्ट फाउंडेशनला मिळालेल्या माहितीनुसार, धरण एनएमएमसीकडे आल्यानंतर एकदाही गाळ काढण्याचे काम झालेले नाही.

हे धरण २०५५ पर्यंत नवी मुंबईची पिण्याच्या पाण्याची गरज भागवेल, असा अधिकृत दावा आहे, मात्र गाळ न काढल्यास हे अंदाज फोल ठरू शकतात, असे बी. एन. कुमार यांनी सांगितले. कुमार म्हणाले की, भारत सरकारच्या राष्ट्रीय गाळ व्यवस्थापन आराखड्यात देखील जलाशयांमध्ये गाळ साचल्याने साठवण क्षमता कमी होते आणि कालांतराने पाणीटंचाई वाढू शकते, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच जलाशय मालकांनी नियमित सर्वेक्षण, गाळ मोजणी आणि आवश्यकतेनुसार गाळ काढणे बंधनकारक असल्याचे नमूद आहे.

"कागदोपत्री धरण निरोगी दिसू शकते, पण प्रत्यक्ष उपयुक्त पाणीसाठा दरवर्षी कमी होत जातो," असे कुमार म्हणाले. दरम्यान, आयुक्तांनी यंदा पाऊस सरासरीच्या ९२ ते ९४ टक्के राहू शकतो, असे हवामान अंदाज सांगितले. त्यामुळे मोरबे परिसरात धरण पूर्ण भरण्याइतका पाऊस न पडण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

"नागरिकांना पाणी वाचवा असे सांगितले जात असेल, तर शहराच्या सर्वात महत्त्वाच्या धरणाची क्षमता वर्षानुवर्षे शांतपणे कमी होऊ का दिली?" असा सवाल कुमार यांनी केला.

# कोकण भवनात लोकसेवा हक्क दिन उत्साहात

## पारदर्शक आणि गतिमान प्रशासनासाठी कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांना मिळणाऱ्या सेवा अधिक पारदर्शक तसेच कालबद्ध पद्धतीने मिळाव्यात या उद्देशाने २८ एप्रिल २०२६ रोजी कोकण भवन येथील विविध शासकीय कार्यालयांमध्ये 'लोकसेवा हक्क दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



कोकण महसूली विभाग राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त बलदेव सिंह यांच्या नेतृत्वात आणि लोक सेवा हक्क दिनानिमित्ताने आयोजित विशेष कार्यक्रमात कोकण भवनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी प्रशासकीय कामकाजात कोणत्याही प्रकारचा विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होणार नाही, अशी ग्वाही देत सामूहिक शपथ घेतली.

कोकण विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमातील तरतुदींचे पालन करत पात्र नागरिकांना विहित कालमर्यादेत आणि सौजन्याने सेवा देण्यास कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

राज्य सेवा हक्क आयोगाच्या सह सचिव रिना फणसेकर यांच्या संकल्पनेतून कोकण भवनाच्या दर्शनी भागात या दिनाचे औचित्य साधून आकर्षक रांगोळी आणि माहितीपर स्टँडीज लावण्यात आल्या होत्या. तसेच, कामानिमित्त आलेल्या नागरिकांना लोकसेवा हक्क अधिनियमाच्या प्रतींचे वाटप करून त्यांना कायद्याने प्रदान केलेल्या अधिकारांची माहिती देण्यात आली.

या दिनानिमित्त राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांमध्ये 'आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे' उद्घाटन करण्यात आले. नागरिकांच्या सोयीसाठी प्रत्येक कार्यालयात अधिसूचित सेवा आणि शुल्काची माहिती देणारे, तसेच तक्रार नोंदवण्यासाठीचे QR Codes लावण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, जिल्ह्यात 'सेवादूत योजना' सुरू करण्यात आली असून, नागरिकांना SMS द्वारे 'आपले सरकार' पोर्टल आणि कायद्याची माहिती देऊन जागृत करण्यात आले.

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि परिसंवादांचे आयोजन करून तरुण पिढीत या कायद्याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच, भारत स्काऊट, एन.सी.सी. आणि एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. उत्कृष्ट काम करणाऱ्या पदनिर्देशित अधिकाऱ्यांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.

हा अधिनियम एक क्रांतिकारी पाऊल असल्याचे नमूद करत, अधिकारी–कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी पूर्ण प्रामाणिकतेने, निष्ठेने आणि संवेदनशीलतेने पार पाडण्याची शपथ घेतली. प्रशासकीय सेवा देताना 'नागरिक केंद्रबिंदू' मानून पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमता साध्य करण्याच्या या संकल्पामुळे सर्वसामान्यांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

# पनवेल महापालिकेकडून महाराष्ट्र दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने १ मे रोजी महाराष्ट्र दिन, कामगार दिनानिमित्त ध्वजारोहण तसेच बुद्ध पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर 'प्रिय आमुचा महाराष्ट्र' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या ६७व्या स्थापना दिनानिमित्त पालिका मुख्यालयात सकाळी ७ वाजता ध्वजारोहणाचे आयोजन करण्यात आले आहे. महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार असून, उपमहापौर, आयुक्त, विविध समित्यांचे पदाधिकारी, सर्व नगरसेवक व महापालिका अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती असेल.

पनवेल महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून 'प्रिय अमुचा महाराष्ट्र' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा आणि महापुरुषांच्या पराक्रमाचा वारसा उलगडणारा हा विशेष कार्यक्रम शुक्रवार, १ मे रोजी सकाळी ११ वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे संपन्न होणार आहे.

'टॅलेंट बॉक्स इव्हेंट्स अँड एन्टरटेनमेंट' निर्मित 'प्रिय अमुचा महाराष्ट्र' हा कार्यक्रम ५१ कलाकारांच्या संचाद्वारे सादर केला जाणारा एक 'महाकलाविष्कार' आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या मातीतील लोककला, संस्कृती आणि छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले अशा थोर महापुरुषांच्या जीवनकार्यावर आधारित विविध सादरीकरणे प्रेक्षकांना पाहायला मिळतील.

या सोहळ्याच्या माध्यमातून पनवेलकरांना महाराष्ट्राच्या वैभवशाली संस्कृतीचा अनुभव घेता येणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने या सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. या दोन्ही कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना करण्यात आले आहे.

# महापालिका मुख्यालयात आज महापौरांच्या हस्ते ध्वजारोहण

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या ६७व्या स्थापना दिनानिमित्त शुक्रवार, १ मे २०२६ रोजी महापालिका मुख्यालय स्तरावरील राष्ट्रध्वजवंदन समारंभ सकाळी ७.१० वाजता महापौर सुजाता सुरज पाटील यांच्या हस्ते मुख्यालय इमारतीच्या प्रांगणात होणार आहे.

त्याचप्रमाणे आठही विभाग कार्यालये, अग्निशामन केंद्र वाशी, तीन रुग्णालये व दोन माता बाल रुग्णालये तसेच ई.टी.सी.अपंग शिक्षण प्रशिक्षण केंद्र वाशी याठिकाणी सकाळी ७ वाजता इतर महापालिका पदाधिकारी यांच्या हस्ते राष्ट्रध्वजवंदन समारंभ आयोजित करण्यात आला आहे. तरी याप्रसंगी नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्यालयाचे सोमवारी उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ऍग्रिकल्चर (एमएसीसीआयए) या राज्यातील अग्रगण्य व्यापारी संघटनेच्या नवी मुंबई येथील नव्या कार्यालयाचे उद्घाटन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते येत्या ४ मे रोजी सकाळी ११ वाजता सीबीडी येथे संपन्न होणार आहे. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रवींद्र माणगावे व माजी उपाध्यक्षा शुभांगी तिरोडकर यांच्यासह महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

सीबीडी बेलापूर, सेक्टर ११ येथे असलेल्या ए अँड जी हाऊस या इमारतीत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे नवीन कार्यालय सुरु करण्यात येणार आहे. नवी मुंबईतील व्यापारी व औद्योगिक क्षेत्राला एक नवे व्यासपीठ या कार्यालयाच्या माध्यमातून मिळणार असून भविष्यातील आर्थिक विकासासाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचे एमएसीसीआयएचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी सांगितले.

राज्याच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या एमएसीसीआयए संस्थेच्या या उपक्रमामुळे नवी मुंबई व परिसरातील उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्राला चालना मिळणार आहे. तसेच स्थानिक उद्योगांना मार्गदर्शन, सल्ला आणि नेटवर्किंगची नवी संधी या ठिकाणी उपलब्ध होणार असल्याचे शुभांगी तिरोडकर यांनी सांगितले.

नवी मुंबईतील उद्योजक, व्यापारी तसेच उद्योग क्षेत्राशी संबंधित व्यक्तींनी या उद्घाटन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे करण्यात आले आहे.

# स्वच्छ सर्वेक्षणासाठी नवी मुंबई महापालिका सज्ज

## ◆ नागरिकांना स्वच्छताविषयक अभिप्राय नोंदविण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षणामध्ये नवी मुंबई आता नियमित क्रमवारीपेक्षा वरच्या दर्जावर 'सुपर स्वच्छ लीग' या विशेष कॅटगरीमध्ये समाविष्ट असून 'सुपर स्वच्छ शहरा'चा मिळालेला बहुमान आपल्या सर्वांना अभिमान वाटण्यासारखा आहेच, सोबतच आपली जबाबदारी वाढविणारा असल्याचे मत नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केले.



नवी मुंबई महानगरपालिकेच्या तहकूब महासभेत महापौर सुजाता पाटील आणि सर्व नगरसेवकांसमोर आयुक्तांनी स्वच्छतेची चळवळ नागरिकांच्या सक्रिय सहभागाशिवाय यशस्वी होणे शक्य नाही त्यामुळे याकामी नागरिकांचे संपूर्ण सहकार्य आणि सक्रिय सहभाग मिळण्यासाठी तसेच सर्वेक्षणांतर्गत सर्व नागरिकांनी अभिप्राय नोंदवावा याकरिता लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.

'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत 'स्वच्छ सर्वेक्षणा'मध्ये नवी मुंबई देशात सातत्याने अग्रभागी राहिलेली असून सन २०२१ मध्ये देशात चौथा, सन २०२२ मध्ये तिसरा, सन २०२३ मध्ये तिसरा आणि सन २०२४ मध्ये 'सुपर स्वच्छ लीग' या विशेष कॅटेगरीमध्ये नवी मुंबईचा समावेश झालेला आहे.

मागील वर्षीपासून जी शहरे सातत्याने पहिल्या ३ क्रमांकात येतात अशा शहरांची स्पेशल कॅटेगरी 'सुपर स्वच्छ लीग' या नावाने बनविण्यात आलेली आहे, जेणेकरून इतर शहरांना क्रमांक मिळविण्याची संधी मिळावी अशी माहिती देत या 'सुपर स्वच्छ लीग' कॅटेगरीमध्ये नवी मुंबईसह इंदौर, सुरत व विजयवाडा ही देशातील इतर ३ शहरे आहेत असे सांगितले.

'सुपर स्वच्छ लीग' कॅटेगरीमधील आपले मानांकन कायम राखणे ही आपली जबाबदारी असून त्यासाठी सर्वेक्षणांतर्गत एकूण गुणांपैकी ८५ टक्के गुण मिळविणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावर्षी १२५०० गुणांची परीक्षा असून परीक्षण करताना 'प्रत्यक्षदर्शी स्वच्छता अर्थात visible cleanliness' ला प्राधान्य देण्यात येणार आहे.

साधारणतः मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात स्वच्छ सर्वेक्षणाचे पाहणी पथक परीक्षणासाठी नवी मुंबईत दाखल होईल असा अंदाज असून यामध्ये 'सिटी प्रोफाईल एरिया'तील विविध स्थळांना ते भेट देतील. तेव्हा प्रत्यक्ष पाहणीप्रमाणेच ते नागरिकांशीही संवाद साधतील आणि त्यांचे अभिप्राय जाणून घेतील अशी माहिती आयुक्तांनी दिली.

नवी मुंबईने आजवरच्या प्रवासात स्वच्छ सर्वेक्षणामधील आपले राष्ट्रीय मानांकन नेहमीच उंचावत ठेवले आहे व राज्यातील प्रथम क्रमांक कायम राखला आहे. यामध्ये अर्थातच सर्व लोकप्रतिनिधींचा, नागरिकांचा आणि आपल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सर्वात महत्वाचा वाटा राहिला असे सांगतानाच गृहनिर्माण संस्था, वसाहती, नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान सारख्या नामांकीत स्वयंसेवी संस्था, मंडळे आमि व्यक्तिगत पातळीवर नागरिकांचाही मोठया प्रमाणात सहभाग लाभतो, यामुळेच हे यश लाभले आहे याचा आवर्जून उल्लेख आयुक्तांनी केला.

स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत मोठ्या संख्येने उपक्रम राबविणारी महानगरपालिका अशी आपली दखल घेतली जात असून या उपक्रमांमध्ये समाजातील सर्व घटक अत्यंत उत्साहाने सहभागी होतात. विशेषत्वाने विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, अगदी तृतीयपंथी नागरिकही या मोहीमांमध्ये उत्साहाने सहभागी होत असतात असे ते म्हणाले.

मुलांमध्ये लहान वयापासूनच स्वच्छतेची आवड निर्माण करून उद्याचे स्वच्छताप्रेमी नागरिक घडविण्याच्या दृष्टीने निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, प्लास्टिक संकलनाचा 'ड्राय वेस्ट बँक उपक्रम' असे अनेक उपक्रम सातत्याने राबविले जात असून त्यामध्ये लाखो विद्यार्थी व त्यांच्यामार्फत त्यांचे पालक व कुटुंबीय या अभियानाशी जोडले गेले आहेत असे आयुक्तांनी आनंदाने सांगितले.

स्वच्छतेविषयी सहज करण्यासारख्या आणि बारकाईने लक्ष देण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. ज्यामध्ये, घरात रोज निर्माण होणारा कचरा घरातूनच ओला आणि सुका असा वर्गीकरण करून देणे. याशिवाय घरगुती घातक कचराही वेगळा ठेवणे व वेगळा देणे. सार्वजनिक ठिकाणी कुठेही कचरा न टाकणे तसेच तो कचरापेटीतच टाकला जाईल याची दक्षता घेणे. उघड्यावर लघुशंका किंवा शौच न करणे. सार्वजनिक शौचालयांचा वापर करणे. मोठ्या सोसायट्यांनी आपल्या आवारातच घनकचरा विल्हेवाटीची व्यवस्था करून दैनंदिन ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे. थ्री आर सेंटर्सचा वापर करणे अशा विविध गोष्टी नियमितपणे करण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात यावे.

तसेच सध्या स्वच्छ भारत मिशनच्या वतीने नागरिकांचे स्वच्छताविषयक अभिप्राय अर्थात सिटीझन फिडबॅक घ्यायला सुरूवात झालेली असून नागरिकांनी वेबसाईट लिंकवर जाऊन किंवा स्वच्छता ॲपचा वापर करुन त्यावर शहर स्वच्छतेशी संबंधित १३ प्रश्नांची सर्वोत्तम उत्तरे देण्याकरिता नागरिकांना प्रेरीत करावे असेही आवाहन आयुक्तांनी याप्रसंगी नगरसेवकांना केले.

आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे यावर्षी 'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने प्रत्येक मानांकित शहराला 'स्वच्छ शहर जोडी' उपक्रमांतर्गत पाच शहरे जोडून देण्यात आली आहेत. या सर्वोत्तम स्वच्छ शहरांनी पाच लहान शहरांना स्वच्छतेतील गुणवत्ता वाढविण्याविषयी मार्गदर्शन करावयाचे आहे.

### एकत्रितपणे काम करण्याचे आयुक्तांकडून आवाहन

नवी मुंबई शहराचा स्वच्छ, सुंदर व राहण्यायोग्य शहर म्हणून दर्जा टिकविण्यासाठी आपण सर्वांनी मिळून नागरिकांच्या संपूर्ण सहयोगाने स्वच्छतेचे आपले 'सुपर स्वच्छ लीग'मधील मानांकन कायम राखण्यासाठी एकत्रित येऊन काम करूया, असे आवाहन यावेळी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले.

# 'मिस्टर इंडिया फायनल'मध्ये झळकणार पनवेलचा ब्रुशद मेटांगे

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलकरांच्या सन्मानात आणखी एका मोठ्या सन्मानाची भर पडते आहे.

पनवेलचा भूमीपुत्र ब्रुशद मेटांगे उंचावेल केवळ पनवेलचीच नाही तर पूर्ण महाराष्ट्राची मान. सामान्य परिवारातील होतकरू, एक जबाबदार फूट बॉल कोच मास्टर ब्रुशद मेटांगे महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करणार ! मिस्टर इंडिया फायनल ( पुरुष सौंदर्य) प्रतियोगितेमध्ये.. रुबरूच्या २०२६ Mr INDIA या प्रतियोगितेमध्ये ब्रुशद मेटांगे यांची निवड झाली असून ही फायनल २ मे २०२६ ला गोवा येथे आयोजित केली आहे.



ब्रुशद एक सुसंस्कृत, सुसभ्य व आदर्शवादी व्यक्ती आहे आणि हा वारसा वडील लाईफ कोच बाळासाहेब (कुमार) मेटांगे यांच्याकडूनच त्याला मिळाला आहे. वडील कुमार मेटांगे यांनी ब्रुशद ला एक जीवनोपयोगी मंत्र दिला की संघर्षमय यात्रा ही एक दिवस सागरा एवढं यश नक्की देते. तेव्हा ब्रुशद हा पनवेलकरांचा मान ठेऊन महाराष्ट्राची शान बनून या रुबरू २०२६च्या मिस्टर इंडिया फायनलमध्ये आपली योग्यता व प्रतिभा सिद्ध करणार.. आपण सगळ्यांनी, अवघ्या महाराष्ट्राने त्याला इन्स्टा वर लाईक , कमेंट्स, शेअर आणि फॉलो अवश्य करा.. विसरू नका..तुमचं लाईक, कमेंट्स वोट म्हणून गृहीत धरलं जाईल..

# माथेरानमध्ये उष्मा वाढला; पर्यटकांची पाठ

**माथेरान : बातमीदार**

माथेरानमध्ये ऐन सुट्ट्यांच्या हंगामात वाढत्या उष्णतेमुळे पर्यटकांनी पाठ फिरवली असून तापमान ४० अंश इतके झाल्याने बहुतांश हॉटेलमधील आरक्षणेही पर्यटकांनी रद्द केली आहेत. येथील पर्यटन व्यवसायावर परिणाम झाला असून पूर्वीचे व आताचे माथेरान यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येत आहे.

हिरवीगार गर्द वनराई ही माथेरानची खरी ओळख हळूहळू संपुष्टात येताना दिसत आहे.गर्द वनराईमुळे हवेत असणारा गारवा आता लोप पावत चालला आहे. सध्याची परिस्थिती पाहता माथेरान हे हिल स्टेशन आहे की हॉट स्टेशन आहे, असाही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.दस्तुरीपासून रेल्वे स्टेशनपर्यंत रस्त्यालगत असणारी मोठमोठी जुनी झाडे सुकत चालली आहेत. केवळ पर्यटन शेतीवर इथल्या सर्वसामान्य लोकांसह, मोलमजुरी करणारे कष्टकरी, हमाल, रिक्षा, घोडा व्यावसायिक, लॉज, हॉटेल धारकांना उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त होत असते, मात्र मुख्य पर्यटन हंगाम सुरू असतानादेखील याठिकाणी काही दिवसांपासून पूर्णपणे मंदीचा सामना स्थानिकांना करावा लागत आहे. यावर उपाययोजना म्हणून आणि माथेरानचे पर्यटन वाचविण्यासाठी आता होतकरू युवकांनी पुढाकार घेऊन परिसरात शेकडो रोपांची लागवड करून ही रोपे जगवली पाहिजेत. प्रशासनामार्फत दरवर्षी पावसाळ्यात वृक्षारोपण करून लाखो रुपयांची बिले काढली जातात. एकदा का वृक्षारोपण केले की, नंतर त्याकडे लक्ष देण्यास येथे कोणत्याही खात्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळ नसतो. त्यामुळे वृक्षारोपणाच्या नावाखाली नुसता देखावा केला जात असल्याचा आरोप केला जात आहे.




**माथेरानसारख्या ठिकाणी एवढी उष्णता पहिल्यांदा अनुभवली. सकाळपासून उन्हाच्या उष्ण झळा सुरू झाल्यामुळे बाहेर फिरायला जाणे टाळून हॉटेलच्या रूममध्ये आराम करणे पसंत केले. पूर्वी इथे पंखे लावण्याची आवश्यकता भासत नव्हती, परंतु ती परिस्थिती आता राहिली नाही. स्थानिकांनी झाडांचे जतन केल्यासच पूर्वीची इथे थंड हवा अनुभवायला मिळेल.**

**–अनिल शिंदे**, पर्यटक, कल्याण

# गालसुरेतील आंब्याची झाडे जळाली

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील गालसुरे गावात शनिवारी (दि. २५) दुपारच्या सुमारास घडलेल्या एका घटनेने स्थानिक बागायतदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. महावितरणच्या विद्युत वाहिनीवरील शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत आंब्याच्या बागेतील चार ते पाच झाडे होरपळून गेल्याची घटना समोर आली आहे.



गालसुरे येथील बागायतदार इम्रान दायांजी यांच्या आंबा बागेतून महावितरणची मुख्य वीजवाहिनी जाते. श्रीवर्धन उपकेंद्रातून बागमांडला परिसरातील गावांना वीजपुरवठा करण्यासाठी उभारण्यात आलेल्या या खांबावरील कट पॉईंटमध्ये अचानक बिघाड होऊन शॉर्ट सर्किट झाले. या वेळी निर्माण झालेल्या ठिणग्या खाली साचलेल्या सुक्या गवतावर पडल्या आणि काही क्षणांतच गवताने पेट घेतला.

आग झपाट्याने पसरत बागेतील आंब्याच्या झाडांपर्यंत पोहोचली. यामध्ये अंदाजे चार ते पाच फळधारक आंबा झाडे होरपळली असून बागायतदाराचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सुदैवाने, घटनास्थळी उपस्थित असलेल्या स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखत तात्काळ पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

या घटनेमुळे वीजवाहिन्यांच्या देखभालीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. उन्हाळ्याच्या काळात सुक्या गवतामुळे आग लागण्याचा धोका अधिक असतो, त्यामुळे विद्युत यंत्रणांची नियमित तपासणी आणि देखभाल करणे अत्यावश्यक असते. मात्र, अशा घटना घडत असल्याने संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

या घटनेबाबत प्राथमिक माहिती महावितरण कार्यालयाला देण्यात आली असून घटनास्थळाचा अहवाल पेण येथील मंडळ कार्यालयात पाठविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून पुढील चौकशी करून आवश्यक ती कारवाई केली जाईल, अशी माहितीही देण्यात आली.

दरम्यान, बागायतदार इम्रान दायांजी यांनी या घटनेची सखोल चौकशी करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. स्थानिक शेतकरी व नागरिकांनी देखील अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी महावितरणने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

एकूणच, या घटनेने ग्रामीण भागातील वीज यंत्रणेच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

# काशीद समुद्रकिनाऱ्यावर रिमोट ऑपरेटिंग बोयाने वाचवला दोघांचा जीव

**अलिबाग : प्रतिनिधी**

काशीद बीच येथे बुधवारी दुपारच्या सुमारास समुद्रात बुडत असलेल्या दोन पर्यटकांना वेळेत बचाव करून त्यांचे प्राण वाचविण्यात यश आले. फुरकन शेख (वय २८) आणि कैफ शेख (वय २२, दोघेही रा. डोंबिवली) अशी पर्यटकांची नावे आहेत.

दोघेही समुद्रात पोहत असताना खोल पाण्यात अडकले होते. यावेळी समुद्रकिनाऱ्यावर तैनात असलेले पोलीस कॉन्स्टेबल रोटकर आणि जीवरक्षक प्रथमेश लाड यांनी तत्काळ धाव घेत बचावकार्य सुरू केले. रायगड जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच उपलब्ध करून देण्यात आलेल्या रिमोट ऑपरेटिंग बोयाच्या सहाय्याने दोन्ही पर्यटकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.



या घटनेत दोघांची प्रकृती स्थिर असून नातेवाईकांच्या मदतीने त्यांना पुढील उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस कॉन्स्टेबल रोटकर यांनी दिली. दरम्यान, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला प्राप्त झालेल्या निधीतून नागाव, काशीद आणि हरिहरेश्वर या किनाऱ्यांवर रिमोट ऑपरेटिंग बोया उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या संकल्पनेतून १२ एप्रिल २०२६ रोजी या उपकरणांचे वितरण करण्यात आले होते.

जिल्ह्यातील इतर समुद्रकिनाऱ्यांनाही लवकरच रिमोट ऑपरेटिंग बोया उपलब्ध करून दिले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी या घटनेनंतर दिली आहे.

# लोक अदालत ९ मे रोजी

**अलिबाग : प्रतिनिधी**

न्यायालयीन प्रलंबित तसेच दाखलपूर्व प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने ९ मे रोजी रायगड जिल्ह्यात सर्व न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. या लोक अदालतीत सुमारे ६० हजार प्रकरणे निकाली काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तेजस्विनी निराळे यांनी ही माहिती दिली. न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

मार्च २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत रायगड जिल्ह्यात पाच वेळा लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या कालावधीत प्रलंबित आणि दाखलपूर्व प्रकरणांचा मोठ्या प्रमाणावर सामोपचाराने निपटारा करण्यात आला. विशेषतः कौटुंबिक वादांवर अधिक भर देण्यात आला होता.

या लोक अदालतीमुळे तब्बल ३१ जोडप्यांचे वाद मिटून त्यांचा संसार पुन्हा सुरळीत झाला. विविध तारखांना घेतलेल्या लोक अदालतींमध्ये हजारो प्रकरणांचा निपटारा करण्यात आला असून, अनेक कुटुंबांना नव्याने आयुष्याची सुरुवात करण्याची संधी मिळाली आहे.

९ मे रोजी होणाऱ्या लोक अदालतीतही मोठ्या संख्येने प्रकरणांचा निपटारा होण्याची अपेक्षा असून नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सातारा–मुंबई एसटीचा अपघात; चालकावर गुन्हा

**खोपोली : प्रतिनिधी**

पुणे मुंबई एक्सप्रेस हायवे वरील खोपोली बाह्य मार्गावर एसटी चालक संतोष सत्यदेव मेश्राम याचे नियंत्रण सुटल्याने एसटी दुभाजकाला धडकून अपघाताची घटना सोमवारी दुपारी घडली. या अपघातात दहा प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली आहे.

एसटीचेदेखील नुकसान झाले. आरोपीत एसटी चालक संतोष याने त्याचे ताब्यातील सातारा ते मुंबई जाणारी एसटी बस मुंबई पुणे एक्सप्रेस वर वेगाने, हयगयीने, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून धोकादायक रित्या चालविल्याने एसटी बस रस्त्यावरील दुभाजकाला ठोकर मारून अपघात झाला. अपघातात प्रवासांना झालेल्या किरकोळ दुखापतीस व एसटी बसचे नुकसानीस कारणीभुत झाल्या प्रकरणी चालक संतोष वर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार वैदेही सावंत करीत आहेत.

# खोपोलीतील समस्यांबाबत पत्रकार समितीची मुख्याधिकाऱ्यांसोबत चर्चा

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद हद्दीत असलेल्या मिळ गाव येथील डम्पिंग ग्राऊंडला वारंवार लागणाऱ्या आगी तसेच शहरातील वाढत्या अतिक्रमणांच्या गंभीर समस्यांबाबत खोपोली पत्रकार समितीने मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्याऐवजी तो जाळला जात असल्याचा गंभीर आरोप पत्रकार समितीने केला. या ठिकाणी बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असल्याने तसेच काही वेळा कार्यरत असूनही त्यातील माहिती उपलब्ध होत नसल्याने कचरा चोरी करणाऱ्यांना मोकळे रान मिळत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.

आगीच्या घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर माती व दगड टाकण्यात येत असल्याचेही आढळून आले. विशेष म्हणजे, या डम्पिंग ग्राऊंडवर खोपोली शहराच्या कचऱ्यापेक्षा बाहेरील कंपन्यांचा कचरा मोठ्या प्रमाणात टाकला जात असल्याची बाब समोर आली असून, त्यामुळेच आग लावण्याचे प्रकार घडत आहेत का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

या सर्व प्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी डम्पिंग ग्राऊंडवर २४ तास नगरपरिषदेचा सुरक्षा रक्षक नियुक्त करण्याची मागणी पत्रकार समितीने केली. तसेच शहरातील बाजारपेठ व मुख्य रस्त्यांवर हातगाड्यांमुळे मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले असून, प्रशासनाचा कोणताही धाक राहिलेला नसल्याची टीका करण्यात आली. हे अतिक्रमण तात्काळ हटवून रस्ते मोकळे करावेत, अशी मागणी करण्यात आली.

घंटागाडी सेवेमध्ये घरातील जुने फर्निचर व गाद्या स्वीकारल्या जात नसल्याने नागरिक अडचणीत असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच भंगार विक्रेते कचरा चोरी करत असल्याने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय ठेकेदारांच्या कामांवर देखरेख ठेवणे, कर्मचाऱ्यांची उपस्थिती नियमित नोंदवणे आणि नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ कार्यवाही करणे या मुद्द्यांवरही चर्चा झाली. या बैठकीस खोपोली पत्रकार समितीचे जयवंत माडपे, अनिल वाघमारे, प्रवीण जाधव, महेबुब जामदार, तय्यब खान, सागर जाधव, शेखर परब, आकाश जाधव, शिवाजी जाधव, मानसी कांबळे, संतोषी म्हात्रे आदी पत्रकार उपस्थित होते.

यावेळी मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी पत्रकार समितीला लेखी निवेदन सादर करण्याचे आवाहन करत, संबंधित समस्यांवर योग्य तो मार्ग काढण्यात येईल असे आश्वासन दिले व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना केल्या. या चर्चेदरम्यान उपमुख्याधिकारी पवार, कार्यालय अधीक्षक विश्वास पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# रायगडला सेवा हक्क अंमलबजावणीत राज्यात आदर्श बनवूया –जिल्हाधिकारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सामान्य नागरिकाला शासकीय सेवा मिळवताना होणारा मनस्ताप, विलंब आणि कागदपत्रांचा डोंगर आता इतिहासजमा होणार असून, रायगड जिल्ह्याला सेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीत राज्यात अग्रक्रमांकावर नेण्याचा निर्धार जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी व्यक्त केला. 'सेवा हक्क दिना'चे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आयोजित विशेष कार्यक्रमात त्यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक आणि लोकाभिमुख कारभाराची शपथ दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आँचल दलाल आदी प्रशासकीय अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.



जिल्हाधिकारी जावळे यांनी प्रशासकीय मानसिकतेत बदलाची गरज अधोरेखित करताना स्पष्ट केले की, देशाला विकसित आणि समृद्ध करण्याच्या प्रवासात सामान्य जनतेला केंद्रबिंदू मानणे अत्यावश्यक आहे. सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवण्यापेक्षा नागरिकांना घरबसल्या आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने डिजिटल सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांनी कंबर कसण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

विशेषतः सेतू केंद्रांमध्ये कामासाठी येणाऱ्या जनतेशी सौजन्याने वागून, त्यांना विनाकारण ताटकळत न ठेवता अनावश्यक कागदपत्रांची मागणी टाळावी, असे त्यांनी निर्देश दिले. ज्या विभागांची कामगिरी सध्या समाधानकारक नाही, त्यांनी तातडीने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ मधील तरतुदींचा सखोल अभ्यास करून आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करावी. प्रत्येक विभागाची सेवा वितरणाची टक्केवारी ९८ च्या पुढे असणे आवश्यक असून, कर्तव्यात कसूर करणाऱ्या किंवा सुमार कामगिरी करणाऱ्या विभागांसाठी पाच हजार रुपयांच्या दंडाची तरतूद असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी सेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी व उत्कृष्ट सेवा वितरणाबद्दल काही अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये संतोष दराडे (सहा. पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा), मितेश विलास म्हात्रे (पोहेका/२३२०, जिल्हा विशेष शाखा), संतोष जनार्दन रूपनवर (पोहेका/१०७२, खोपोली पोलीस ठाणे), दिनेश कृष्णा भंडारे (पोहेका/११८०, खालापूर पोलीस ठाणे), मनीषा वामनराव जयभाये (ग्रामपंचायत अधिकारी, करंजाडे), विजय किसन अहिरे (ग्रामपंचायत अधिकारी, वरसे), वैभव बाळकृष्ण पाटील (ग्रामपंचायत अधिकारी, वारसावे), मुकेश पखाळ (उपविभागीय अधिकारी, अलीबाग), संदीप सानप (उपविभागीय अधिकारी, माणगाव), भंजनजय जाधव (तहसीलदार, कर्जत), राजश्री साळवी (महसूल नायब तहसीलदार, मुरूड) व भारत फुलमाळी (निवासी नायब तहसीलदार, सुधागड) यांचा समावेश होता.

या कार्यक्रमाला उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके, प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण आदी उपस्थित होते.

# शुभांगी कोतवाल सेवानिवृत

**मुरूड : प्रतिनिधी**

एकात्मिक बाल विकास मुरूड कार्यालयातील पर्यवेक्षिका शुभांगी शाम कोतवाल या ३० वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत झाल्या आहेत. त्यांचा निरोप समारंभ दरबार हॉल येथे संपन्न झाला. मुरुड तालुक्यातील शेकडोच्या संखेने अंगणवाडी सेविका व मदतीस यांनी या कार्यक्रमासाठी मोठी गर्दी केली होती.

शुभांगी कोतवाल यांनी १४ वर्ष अंगणवाडी सेविका व तद्नंतर पदोन्नती मिळाल्यावर १६ वर्षे त्यांनी पर्यवेक्षिका या पदावर उत्कृष्ट काम केले होते. मुरुरूडमधील बाल विकास प्रकल्प अधिकारी संजय शेडगे, मुरूड पंचायत समिती सदस्य गणेश नाकती, माजी सरपंच मनीष नांदगावकर, शाम कोतवाल, इंदिरा ठाकूर, विजयता खेऊर, संगीता पाटील, कांचन शिंदे, अरुणा भाटकर, सोनाली ठाकूर आदी मान्यवर यांच्या शुभ हस्ते शुभांगी कोतवाल यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व मोठी फोटो फ्रेम देऊन त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला.



# जनगणनेसाठी शिक्षकांना मोबाईल देण्याची मागणी

**चौक : प्रतिनिधी**

देशात जनगणना सुरू होत असून जनगणना करण्यासाठी प्रगणक व पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

जनगणना २०२७ साठी देशात प्रगणक आणि पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत खालापूर तालुक्यातील प्रशिक्षण नवीन प्रशासकीय भवन खालापूर येथे २७ ते २९ एप्रिल असे तीन दिवसीय प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणासाठी नियंत्रक म्हणून महसूल सहाय्यक राम पवार यांनी काम पाहिले. नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी प्रशिक्षकांच्या समस्या जाणून घेऊन मार्गदर्शन केले.



यावेळी शिक्षक भारतीचे राज्य उपाध्यक्ष शिक्षक विनोद कडव आणि सतिश सोनावणे यांनी शिक्षकांच्या वतीने समस्या मांडल्या. हे जनगणनेचे सर्व्हेक्षण हे अँपद्वारे करण्यात येणार आहे, परंतू हे ॲप अँन्ड्रॉइड व्हर्जन १२.५ चा मोबाईल असणे आवश्यक आहे, परंतू अनेक शिक्षकांकडे असे मोबाईल नाहीत.शिक्षण सेवक म्हणून रुजू झालेले शिक्षक हे अल्प मानधनावर काम करतात अशा शिक्षकांना साधारण तीस हजार रुपये किमतीचा खर्च मोबाईल खरेदी करणे शक्य होणार नाही.

राज्य उपाध्यक्ष विनोद कडव यांनी या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधून शासनाकडे मोबाईलची मागणी केली आहे. सर्व शिक्षकांची मागणी लक्षात घेऊन वरिष्ठांकडे सदर मागणी पोहचविण्याचे आश्वासन नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी दिले. यावेळी सर्व शिक्षकांच्या सहयांचे निवेदन नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांना देण्यात आले.

यावेळी शिक्षक भारतीचे राज्य उपाध्यक्ष विनोद कडव, अध्यक्ष शिक्षक संघ संदीप जाधव, शिक्षक भारती जुनी पेन्शन युनिट अध्यक्ष पंकेश पालांडे, शिक्षक नेते सतिश सोनावणे, शिक्षक भारतीचे हरिश्चंद्र साळूंखे, सचिन पाटील, जयेंद्र पाटील, राजेंद्र दुर्गे, भूषण पिंगळे, सचिन पाटील, भरत आडे, ज्येष्ठ शिक्षक हणमंत गाडे, सचिन कडू आदी उपस्थित होते.

# स्नेहा धारपवारचे वैज्ञानिक मानसशास्त्र विषयात यश

**चौक : प्रतिनिधी**

आदिवासी समाजातील स्नेहा विश्वनाथ धारपवार यांनी वैज्ञानिक मानसशास्त्र हा विषय घेऊन एमए परीक्षा उत्तीर्ण झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

खालापूर तालुक्यातील मौजे विणेगाव दांडवाडी या आदिवासीवाडीत राहणारी स्नेहा विश्वनाथ धारपवार यांनी परिस्थितीवर मात करून एमएची परीक्षा वैज्ञानिक मानसशास्त्र हा विषय घेऊन उत्तीर्ण झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. स्नेहा विश्वनाथ धारपवार ही आदिवासी दुर्गम भागात राहत असून पुणे विद्यापीठामधून तिने परीक्षा दिली.

आर्थिक परिस्थितीवर मात करून तिने अभ्यास पूर्ण केला, वडील विश्वनाथ धारपवार हे मोलमजुरी करून आदिवासी बांधवांचे शैक्षणिक दाखले, जातीचे दाखले करून देण्याचे काम करतात.

आपल्या आई वडिलांची मेहनत, वडिलांना शिक्षणाची असणारी आवड यामुळेच आपला प्रवास सुखकर झाला असून आदिवासी समाज शिक्षित व्हावा यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे कुमारी स्नेहा विश्वनाथ धारपवार हिने सांगितले. कुमारी स्नेहा विश्वनाथ धारपवार या एका शिक्षण संस्थेवर शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

# हैदराबादचा मुंबईवर शानदार विजय

## रायन रिकल्टनची विक्रमी सेंच्युरी ठरली व्यर्थ

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील वानखेडेच्या मैदानात सनरायझर्स हैदराबादच्या संघाने आपल्या आयपीएल कारकिर्दीतील दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वोच्च धावसंख्येचा यशस्वी पाठलाग करत घरच्या मैदानावर खेळणाऱ्या मुंबई इंडियन्सला पराभवाचा धक्का दिला. या सामन्यातील दिमाखदार विजयासह सनरायझर्स हैदराबादचा संघ गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर पोहचला आहे. दुसरीकडे मुंबई इंडियन्ससाठी आठ सामन्यातील सहाव्या पराभवासह प्लेऑफचा मार्ग अधिक खडतर झाला आहे.



पहिल्यांदा फलंदाजी करताना रायन रिकल्टनच्या विक्रमी शतकी खेळीच्या जोरावर मुंबई इंडियन्सच्या संघाने निर्धारित २० षटकात २४३ धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना ट्रॅविस हेड आणि अभिषेक शर्माने सनरायझर्स हैदराबादला धमाकेदार सुरुवात करून दिली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ५२ चेंडूत १२९ धावांची खेळी करत मुंबईच्या गोलंदाजांचे खांदे पाडले. ही जोडी माघारी फिरल्यावर हेन्री क्लासेन याने पुन्हा एकदा आपल्या फलंदाजीतील क्लास दाखवत संघाचा विजय निश्चित करणारी आश्वासक खेळी केली. धावांचा पाठलाग करताना मुंबईकडून अल्लाह गझनफर वगळता अन्य कोणत्याही गोलंदाजाला छाप सोडता आली नाही. परिणामी रायन रिकल्टनच्या विक्रमी शतकी खेळी व्यर्थ ठरली.

मुंबईच्या वानखेडेच्या मैदानात नाणेफेक जिंकून हार्दिक पांड्याने पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. नव्या सलामी जोडीचा प्रयोगही यशस्वी ठरला. रायन रिकल्टन आणि विल जॅक्स जोडीने पहिल्या विकेटसाठी ४३ चेंडूत ९३ धावांची भागीदारी रचत संघाला दमदार सुरुवात करून दिली. जॅक्स २२ चेंडूत ४६ धावांची खेळी करून परतल्यावर मैदानात उतरलेला सूर्यकुमार यादव पुन्हा अपयशी ठरला. त्याने पाच धावांची भर घालून तंबूचा रस्ता धरला. नमन धीरने १७ चेंडूत २२, तर कर्णधार हार्दिक पांड्या १५ चेंडूत ३१ धावा करून माघारी फिरल्यावर रिकल्टन याने शेवटपर्यंत मैदानात थांबत ५५ चेंडूत १० चौकार आणि आठ षटकारांच्या मदतीने १२३ धावा करत संघाच्या धावफलकावर पाच विकेट्सच्या मोबदल्यात २४३ धावा लावल्या. धावांचा पाठलाग करताना अभिषेक शर्मा आणि ट्रॅविस हेड यांनी संघाला धडाकेबाज सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी १२९ धावांची भागीदारी रचली. अभिषेक २४ चेंडूत चार चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ४६ धावा करून परतल्यावर यंदाच्या हंगामात धावांसाठी संघर्ष करणाऱ्या हेडने या सामन्यात ३० चेंडूत चार चौकार आणि आठ षटकारांच्या मदतीने ७६ धावांची खेळी साकारली.

क्लासेन याने ३० चेंडूत नाबाद ६५ धावा केल्या, तर अखेरच्या षटकात सलिल अरोरा याने १० चेंडूत ३००च्या स्ट्राईक रेटने नाबाद ३० धावा कुटल्या.

## रियान परागवर दंडात्मक कारवाई



**नवी दिल्ली** : यंदाच्या आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सचा संघ एकीकडे सातत्यपूर्ण खेळ करत असताना मैदानाबाहेरील घडामोडींमुळे सातत्याने अडचणीत सापडला आहे. राजस्थानचा कर्णधार रियान पराग ई-सिगारेट स्मोकिंगमुळे वादात सापडला होता. त्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर अखेर त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. पंजाब किंग्सविरुद्ध न्यू मुल्लापूर येथे झालेल्या लढतीदरम्यान रियान पराग हा स्मोकिंग करतानाचे दृश्य कॅमेऱ्यामध्ये चित्रित झाले. त्यामुळे आयपीएल शिस्तपालन समितीने रियान परागवर दंडाची कारवाई केली आहे. त्याला सामना शुल्काच्या २५% दंड ठोठावण्यात आला आहे.

## सचिन तेंडुलकरच्या 'त्या' कृतीने जिंकली मने



**विशाखापट्टणम** : आपल्या खेळाने जगभरातील कोट्यवधी चाहत्यांची मने जिंकणारा खेळाडू मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर नम्र व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखला जातो. नुकताच आंध्र प्रदेशातील एका कार्यक्रमात सचिनमधील संस्कारांची प्रचिती पुन्हा एकदा आली. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

विशाखापट्टणम येथील आंध्र विद्यापीठाच्या शताब्दी सोहळ्याला विशेष पाहुणा म्हणून सचिन उपस्थित होता. यावेळी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी सचिनला भगवान व्यंकटेश्वराची मूर्ती भेट म्हणून दिली. मूर्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने आपले बूट (शूज) काढले आणि अत्यंत आदराने नतमस्तक होऊन मूर्तीचा स्वीकार केला. सचिनच्या जमिनीवर असलेल्या स्वभावाचे आणि नम्रतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.




**पनवेल : दै.रामप्रहरचे व्यवस्थापक दादाराम मिसाळ यांचा पुत्र अक्षय याचा विवाह नुकताच रसिका बोरकर हिच्याशी झाला. यानिमित्ताने आयोजित हळदी समारंभास आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.**











